



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १७६ * नांदेड * शनिवार, दि. ४ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# पुढील ४ दिवसांत राज्यात मुसळधार पाऊस

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यभरात पावसाचा जोर कायम असल्याचे चित्र आहे. तर हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान, पुढील चार दिवस मुंबई, कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला. दरम्यान, अशातच हवामान विभागानं महत्वाची माहिती दिली आहे.

७ जुलैपर्यंत राज्यभर पावसाच्या जोरदार सरींचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, कोकण आणि घाटमाथ्यावर अनेक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भातही ३ ते ७ जुलैदरम्यान काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्र ते कर्नाटक किनारपट्टीदरम्यान ऑफ-शोअर ट्रफ सक्रिय आहे.

## मुंबईत सलग तिसऱ्या दिवशी संततधार

मुंबईत सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पहाटेपासूनच शहर आणि उपनगरांमध्ये जोरदार सरी कोसळत असून पावसाचा जोर कायम आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून आकाश ढगाळ आहे. हवामान विभागाने मुंबईत पुढील काही तासांतही मध्यम ते जोरदार, तर काही ठिकाणी अतिजोरदार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे मुंबईकरांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झालं आहे. ते पुढील दोन दिवसांत अधिक प्रभावी होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठ, डोंगराळ भाग आणि सखल परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावं असं आवाहन देखील हवामान विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे. स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि अनावश्यक प्रवास टाळावा असे आवाहन हवामान विभागानं केलं आहे.

चिपळूणमध्ये जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसामुळं शहरातील सखल भागात पाणी साचलं आहे. दुपारनंतर चिपळूणमध्ये पावसाचा जोर वाढला आहे. खेडमध्ये जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. चिपळूणसह खेड, गुहागर, दापोली भागात जोरदार पाऊस सुरु आहे.

नाळिक जिल्ह्यात देखील दमदार पावसाला सुरुवात झाली आहे. महिनाभराच्या विश्रांतीनंतर नाशिकच्या कळवण पश्चिम पट्ट्यात पावसाने शुक्रवारी जोरदार बॅटिंग करत सुरुवात केली. शुक्रवारी झालेल्या दमदार पाऊसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. तर अनेक घराच्या पायरीपर्यंत पावसाचे पाणी शिरलं आहे. पावसामुळे कच्च्या घरच्या भिंती पडण्याची दाट शक्यत निर्माण झाली आहे. दरम्यान, पावसाच्या आगमनाने बळीराजा आनंदला असून पश्चिम पट्ट्यात भात लागवडीसह खरीप पिकांच्या पेरणीला वेग येणार आहे.

# 'एल निनो'चा प्रभाव, राज्यासह देशात संकटाचे ढग गडद

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** 'एल निनो'चा प्रभाव राज्यासह देशावर दिसून येत आहे. अशातच जूनमध्ये झालेला ९९.०५ मिमी पाऊस हा १९०१ नंतरचा पाचव्या क्रमांकाचा सर्वात कमी पाऊस आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस पडण्याची शक्यता असली तरी, एकूणच परिस्थिती निराशाजनक असणारा आहे. तर प्रमुख जलाशयांमधील पाणीसाठा गेल्या वर्षीच्या जूनच्या तुलनेत २५% कमी असल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. मान्सूनच्या महिन्यांपैकी सर्वात महत्त्वाच्या असलेल्या जुलै महिन्यात पाऊस 'सरासरीपेक्षा कमी' म्हणजेच या महिन्यासाठीच्या सामान्य पावसाच्या ९४% पेक्षा कमी असेल, असे भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले. सध्या भारतात मान्सूनच्या पावसाची तूट ४०% इतकी असल्याचे ते म्हणाले.

# हॉटेल चालक आणि दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्यांना तुकाराम मुंढेंची वॉर्निंग; नवीन नियमावली जारी

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढेंच्या करवाईचा धडाका सुरुच असून गेल्याच आठवड्यात त्यांनी हॉटेल व्यवसायिकंसाठी नियमावली सादर करत कारवाईला सुरुवात केली होती. तत्पूर्वी पनीर विक्रेते, बेकरी व्यवसायिकांनाही आपल्या कामाचा धाक दाखवत भेसळयुक्तांवर कारवाईचा बडगा उगारला होता. आता, दूध सम्राटांकडे त्यांनी आपली नजर वळवली असून तुकाराम मुंढेंचा दूध विक्रेत्यांवर स्ट्राईक केला जात आहे. त्याच अनुषंगाने नियमावली सादर करण्यात आली असून 'सेव्ह फुड, सेव्ह ड्रग' ही मोहिम हाती घेण्यात आली आहे. ग्राहकांच्या ताटात दूध, दुग्धजन्य पदार्थ पोहोचण्यापर्यंतची निर्बंध स्पष्ट नमूद करण्यात आलं आहे.

राज्यात 'सेव्ह फूड सेव्ह ड्रग' ही मोहीम आता आपण हाती घेतली आहे, आपल्या अन्नात सगळ्यात महत्वाचा घटक असतो तो म्हणजे दूध. दूध उत्पादकांची बैठक मी घेतली होती, त्यांना प्रेझेंटेशन दाखवलं असून दूध प्रोडक्ट इकोसिस्टम असली पाहिजे. फार्म टू प्लेट प्रोसिजर आपल्याला बघावी लागेल, असे तुकाराम मुंढेंनी म्हटलं. दुधातली भेसळ, कृत्रिम दूध या सगळ्या संबंधी गाईडलाइन्स दिल्या आहेत. त्यासंदर्भातील आदेश आपण दिले आहेत, दूध उत्पादकांना पॅकर्सपासून सेलर पर्यंत ८ प्रकारचे नियम सगळ्यांना लागू आहेत, अशी माहितीही तुकाराम मुंढेंनी पत्रकार परिषदेत दिली. दूध संकलन केंद्र, दूध कुलिंग सेंटर, किरकोळ विक्रेते, बल्क दूध विक्री करणारे, पनीर, खवा, लोणी, क्रीम, चीज, आयस्क्रीम विक्रेते या सगळ्यांना हे नियम लागू असतील, असेही मुंढेंनी म्हटले.

हॉटेल व्यवसायिकांसाठी आपण सुरू केलेल्या मोहिमेत असंही आढळून आलं की, अनेकांनी नियमानुसार बदल केले आहेत. मात्र, काही हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पेस्ट कंट्रोल केलं असं सर्टिफिकेट दाखवतात. मात्र, प्रत्यक्षात पेस्ट कंट्रोल काही हॉटेलमध्ये केलं नव्हतं, त्यांचे लायसन्स रद्द करण्याचे काम आम्ही केलं आहे. त्यामुळे, मला फक्त सर्टिफिकेट नको आहेत, काम न केल्यास थेट लायसन्स रद्द केले जातील, अशा इशाराच तुकाराम मुंढेंनी दिला आहे.

महाराष्ट्र शासनाने दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या संपूर्ण पुरवठा साखळीत अन्न सुरक्षा व गुणवत्ता मानकांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यव्यापी सर्वकष अनुपालन आदेश जारी केला आहे. हा आदेश दूध संकलन शीतकरण प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक वितरण आणि विक्री या सर्व टप्प्यावर लागू असेल, व्यवसाय, चालकासाठी बंधनकारक आहे, असे तुकाराम मुंढेंनी म्हटले. आदेशाचा उद्देश केवळ भेसळ रोखणे नसून सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण वाढ करणे, प्रामाणिक दुध व्यवसायांना प्रोत्साहन देणे आणि राज्यात आधुनिक अन्न सुरक्षा संस्कृती विकसित करणे हा आहे.

# अयोध्या राम मंदिर देणगी चोरी प्रकरण; 'बँक ऑफ बडोदा'ला पोलिसांची नोटीस

**अयोध्या (प्रतिनिधी)–** अयोध्येतील राम मंदिरातील देणगी चोरीचे प्रकरण सध्या देशभरात चांगलंच गाजत असून राजकीय आणि सामाजिक वर्तुळात यावरून खळबळ उडाली आहे. या हायप्रोफाइल प्रकरणाचा तपास करत असताना अयोध्या पोलिसांनी आता 'बँक ऑफ बडोदा'च्या अयोध्या शाखेला कायदेशीर नोटीस बजावून कसून चौकशी केली आहे.

या चौकशी दरम्यान बँक ऑफ बडोदामधील राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे खाते, त्यात जमा होणारी रक्कम आणि या प्रकरणातील मुख्य आरोपींचे बँक व्यवहार यांबाबत अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बँक ऑफ बडोदामध्ये ट्रस्टचे एक अधिकृत खाते आहे, त्यामध्ये भाविकांकडून येणारी केवळ ऑनलाइन देणगी जमा केली जाते. मंदिर परिसरात लावण्यात आलेल्या क्यूआर कोडद्वारे मिळणारे पैसेच थेट या खात्यात जमा होतात. या बँकेत कोणत्याही स्वरूपात रोख व्यवहार होत नाहीत, तसेच बँकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याचा ट्रस्टमध्ये किंवा मंदिरात जमा होणारी रोकड मोजण्यात कोणताही सहभाग नाही.

# शिवसेना ठाकरे गटाचे ५ जुलैला मुंबईत 'रामरक्षा' आंदोलन

## अयोध्येत दानपेटी व देणगी निधीच्या अपहार प्रकरणावरून रणशिंग

**मुंबई (प्रतिनिधी)–** अयोध्येतील श्रीराम मंदिरातील दानपेटी आणि देणगी निधीच्या कथित अपहाराच्या प्रकरणावर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षावर अत्यंत आक्रमक शब्दांत जोरदार हल्लाबोल केला. राम मंदिराच्या निधीवर भाजपने दरोडा टाकल्याचा थेट आरोप करत उद्धव ठाकरे यांनी भाजपविरोधात थेट रणशिंग फुंकले आहे. या लुटीचा जाब विचारण्यासाठी येत्या रविवारी (दि. ५ जुलै) दादर येथील हनुमान मंदिराजवळ भव्य 'रामरक्षा' आंदोलन करण्याची



घोषणा त्यांनी केली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आज देशामध्ये भारतीय जनता पक्षाच्या काळात राम मंदिराचा मुद्दा वेगळ्या एका गोष्टीमुळे चर्चेला जातोय, हे दुर्दैव आहे. राजकीय पक्ष तोडले जात आहेत, आमदार गोव्यात किंवा इतरत्र पळवले जात आहेत, खरेदी-विक्री होते आहे आणि याला 'ऑपरेशन' नाव दिले जाते. मग आता ऑपरेशन राम मंदिर भाजप करतंय का? हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणून मला असं वाटतं की, या सगळ्या बातम्या दाखवल्या जात असतील, नसतील, बातम्या छापून येत असतील नसतील, पण राम मंदिरावरती दरोडा तर टाकला जातोय, टाकला गेलाय; त्याचे पुरावे सुद्धा दिले गेले आहेत, काही जणांचे म्हणणे आहे की चोरीचा पैसा इतर पक्ष फोडण्यासाठी वापरला जातोय, हे फार गंभीर आहे, असा आरोप त्यांनी केला.

# राज्यातील शाळांच्या परिसरात अपायकारक स्टिंग एनर्जी ड्रिंक व अन्नपदार्थ विक्रीस बंदी

**मुंबई (प्रतिनिधी)–** शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास अपायकारक ठरणारे अन्नपदार्थ, तसेच स्टिंग एनर्जी सारखी कॅफिनयुक्त पेयांची विक्री करण्यास सरकाने बंदी घातली आहे. अशा पेयांची विक्री होत आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली.

स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या सेवनामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत सदस्य विक्रम पाचपुते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री झिरवाळ बोलत होते. यावेळी सदस्य राहुल कुल आणि वरुण सरदेसाई यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री झिरवाळ म्हणाले की, शाळांच्या आवारात व परिसरात बालकांच्या आरोग्यास अपायकारक अन्नपदार्थ आणि कॅफिनयुक्त पेयांची विक्री होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

# इन्स्टाग्रामवरील आक्षेपार्ह जाहिरातींवर सरकारची कारवाई

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतातील इन्स्टाग्रामवर बाल लैंगिक शोषणाला प्रोत्साहन देणाऱ्या कथित आक्षेपार्ह जाहिरातींची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने मेटाकडून स्पष्टीकरण मागवण्याचे निर्देश दिले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांनी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यास सांगितले आहे.

# हिमाचलमध्ये पावसाचा कहर; किन्नौरमध्ये राष्ट्रीय महामार्ग-५ बंद



**शिमला (प्रतिनिधी)–** हिमाचल प्रदेशात मान्सूनने जोरदार हजेरी लावताच विविध भागांत नैसर्गिक आपत्तींचे संकट गडद झाले आहे. जनजातीय जिल्हा किन्नौरमध्ये चोलिंग परिसरात झालेल्या मुसळधार पावसानंतर अचानक आलेल्या पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. पुराच्या पाण्यासोबत आलेल्या माती, दगड आणि चिखलामुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५ पूर्णपणे वाहतुकीसाठी बंद झाला असून अनेक वाहने रस्त्यात अडकली आहेत.

पुराचा वेग इतका प्रचंड होता की महामार्गावरून जाणारी अनेक वाहने चिखल आणि ढिगाऱ्यात अडकून पडली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्वजण सुरक्षित आहेत.घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने बचाव आणि मार्ग मोकळा करण्याचे काम सुरू केले. किन्नौरचे उपायुक्त डॉ. अमित कुमार शर्मा यांनी घटनेची पुष्टी करत महामार्गावरील मलबा हटवण्यासाठी आणि अडकलेली वाहने बाहेर काढण्यासाठी जड यंत्रसामग्री तैनात करण्यात आल्याचे सांगितले. प्रशासनाचे पथक घटनास्थळी कार्यरत असून राष्ट्रीय महामार्ग लवकरात लवकर पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.


दरम्यान, लाहौल-स्पीती जिल्ह्यातील जाहलमा नाल्यात आलेल्या पुरामुळे पूल पुन्हा एकदा बाधित झाला आहे. सीमारेषा रस्ते संघटनेने उभारलेली तात्पुरती पुलियाही पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने उदयपूर उपविभागासह पांगी खोऱ्याचा संपर्क तुटला आहे. या परिस्थितीत उदयपूर उपविभागातील शेनूर गावातील शांती देवी यांना छातीत संसर्ग आणि श्वास घेण्यास त्रास होत असल्याने कुल्लू येथे उपचारासाठी हलविण्यात येत होते.

# विद्यार्थ्यांना पोषक आहार म्हणून निकृष्ट तांदूळ देणाऱ्या दोन युनिटवर 'एफडीए'ची कारवाई

## कारवाईची माहिती देण्यास विभागाची टाळाटाळ, विद्यार्थ्यांचे आरोग्य वाऱ्यावर

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** जिल्ह्यामध्ये जवळपास ७५ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील हजारो विद्यार्थ्यांना शासनाकडून पुरविण्यात येणारा सकस आहार पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांकडून अतिशय निकृष्ट दर्जाचा तांदूळ व अन्य साहित्य पुरविल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या दोन्हीही पोषक आहार तयार करणाऱ्या युनिटवर अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने कारवाई करून धान्यांचा नमुना ताब्यात घेतला आहे. मोठ्या प्रमाणात या कंत्राटदाराकडे निकृष्ट दर्जाचा साठा असल्याचे उघड झाले असले तरी एफडीएने मात्र कारवाई झाल्याची माहिती माध्यमांकडे दिली नाही. यामुळे एफडीएच्या कारवाईवर संशय व्यक्त करण्यात येत असून लवकरच या दोन्ही कारवायांची माहिती अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे देण्यात येणार असल्याचेही तक्रारकर्त्याने सांगितले आहे.

नांदेड शहराच्या डॉक्टर लेन भागात मे. तोष्णीवाल या मेडिकलवरून एक्सपायर झालेली औषधी विक्री होत असल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा नांदेडमध्ये विद्यार्थ्यांच्या तोंडी जाणाऱ्या पोषण आहारामध्ये मोठा गोंधळ झाल्याची बाब पुढे आली आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बाबानगर आणि वसंतनगर भागात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना खिचडी व अन्य सकस आहार पुरविण्याचे कंत्राट जिल्हा परिषदेने आपल्या मर्जीतील खासगी व्यक्तींना देण्यात आले आहे. या व्यक्तींकडून नांदेड शहरात खिचडी व अन्य पोषक आहार तयार करून तो वाहनांद्वारे शहरापासून ५० किलोमीटर अंतरापर्यंत असलेल्या शाळांना पुरवठा करण्यात येतो. अगोदरच निकृष्ट दर्जाचा आहार या ठिकाणी (कुठल्याही शासकीय मेनूनुसार तयार न केलेला) संबंधित शाळांपर्यंत व तेथून विद्यार्थ्यांच्या तोंडापर्यंत कसा पोहोचत असेल याबाबत न बोललेले बरे. विशेष करून हा पोषण आहार सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना पुरविल्या जातो. एकंदरीत या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या बाबीची तक्रार एका दक्ष आणि जागृत नागरिकाने आयुक्त तुकाराम मुंढे यांना केल्यानंतर एफडीएने बाबानगर आणि रात्री उशिरा शहराच्या वसंतनगर भागातील शाळा परिसरात खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या युनिटवर कारवाई केली. मात्र या ठिकाणी निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य किती सापडले? अन्न नमुना तपासणीसाठी घेतला किंवा नाही? अन्नपुरवठा करणारा कंत्राटदार कोण? याची माहिती मात्र संबंधित विभाग देण्यास टाळाटाळ करत आहे. या बाबीकडे विशेष म्हणजे अन्न व नागरी पुरवठा विभाग, जिल्हा परिषदेचे शिक्षण विभाग आणि स्वत: जिल्हा परिषद प्रशासन अशा कंत्राटदाराची पाठराखण करत आहे की काय? असा प्रश्नही या निमित्ताने तक्रारकर्त्याने व्यक्त केला आहे. या दोन्हीही कारवायांची सविस्तर माहिती एफडीएने दिली नाही तर हा प्रकार आयुक्त मुंढे यांच्या कानावर टाकू असा इशाराही तक्रारकर्त्याने बोलून दाखवला आहे. कारवाई करणाऱ्या एफडीए आणि शिक्षणाधिकारी यांचे मोबाईल फोन नॉट रिचेबल असल्याने अधिकची माहिती मिळू शकली नाही.




# शहरामध्ये भरदिवसा चार लाखांची बॅग लिफ्टिंग; चोरट्यांचे धूमस्टाईल पलायन, पोलीस चोरट्यांच्या मागावर

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मालेगाव रोडवर भरदिवसा घडलेल्या चोरीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे. एका चारचाकी वाहनामध्ये ठेवलेली तब्बल ४ लाख रुपयांची रोकड असलेली बॅग दुचाकीवरून आलेल्या तीन चोरट्यांनी चलाखीने लंपास करत धुमस्टाईल पलायन केले. शुक्रवार, दि.३ जुलै रोजी दुपारी घडलेल्या या घटनेप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे.

उमरखेड येथील रहिवासी सुजित भीमराव सुरवसे हे कामानिमित्त नांदेडमध्ये आले



होते. त्यांच्या मित्राने मालेगाव रोडवरील एसबीआय बँकेतून ४ लाख रुपये काढून ते सुरवसे यांच्या ताब्यात दिले. ही रोकड त्यांनी आपल्या कारमध्ये (एम. एच.१९-सीव्ही ९००१) ठेवली. त्यानंतर बँकेसमोरील एका कॉम्प्लेक्समध्ये वकिलांना भेटण्यासाठी ते गेले. त्यावेळी त्यांच्या दोन मुली कारमध्येच बसलेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत दुचाकीवरून आलेले तीन चोरटे कारजवळ पोहोचले. त्यांनी मुलींना, कारच्या इंजिनखाली ऑईल सांडले असून गाडीला आग लागू शकते, तात्काळ खाली उतरा, असे सांगितले. या बोलण्यावर विश्वास ठेवून दोन्ही मुली घाईघाईने कारबाहेर उतरल्या.

त्याच क्षणी चोरट्यांपैकी एकाने कारचा दुसरा दरवाजा उघडून ४ लाख रुपयांची बॅग उचलली. त्यानंतर तिन्ही आरोपी दुचाकीवरून वेगाने पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच भाग्यनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज ताब्यात घेण्यात आले असून आरोपींचा माग काढण्याचे प्रयन सुरू आहेत.

# इस्रो मुख्यालय बॉम्बने उडवण्याची धमकी; सुरक्षा यंत्रणा अलर्टवर

**बंगळुरू (प्रतिनिधी)–** भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) मुख्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांच्या कार्यालयाला एक धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर तात्काळ पोलीस आणि बॉम्ब शोध पथक घटनास्थळी दाखल झाले.

माहितीनुसार, धमकीचा ई-मेल मिळताच सुरक्षा यंत्रणांनी त्वरित कारवाई करत इस्रो मुख्यालयाची कसून तपासणी सुरू केली. बॉम्ब स्क्वाडने संपूर्ण परिसराची सखोल तपासणी केली असून प्राथमिक तपासणीत कोणतीही संशयास्पद किंवा स्फोटक वस्तू आढळलेली नाही. दरम्यान, या ई-मेलचा स्रोत शोधण्यासाठी पोलीस वेगवेगळ्या पथकांच्या मदतीने तपास करत आहेत. हा ई-मेल देशाबाहेरून पाठवण्यात आला आहे का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. अशा प्रकारची धमकी मिळण्याची ही पहिली घटना नाही.

यापूर्वीही दिल्लीतील काही शाळांना अशाच प्रकारचे बॉम्ब धमकीचे ई-मेल मिळाले होते, ज्यामुळे त्या भागात मोठी सुरक्षा तपासणी करण्यात आली होती. सध्या इस्रो परिसरात कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# व्हॉट्सॲपचे नवे फिचर: सोयीपेक्षा धोका जास्त

डिजिटल युगात संवादाची व्याख्या बदलून टाकणाऱ्या व्हॉट्सॲपने आता मोबाईल क्रमांकाऐवजी 'यूजरनेम'च्या आधारे संवाद साधण्याचे नवे वैशिष्ट्य आणण्याची तयारी सुरू केली आहे. प्रथमदर्शी हे फिचर गोपनीयता जपणारे आणि वापरकर्त्यांसाठी अधिक सोयीचे वाटत असले तरी त्यातून निर्माण होणाऱ्या सायबर सुरक्षेच्या धोक्यांबाबत केंद्र सरकारने व्यक्त केलेली चिंता दुर्लक्षित करता येणार नाही. तंत्रज्ञानातील प्रत्येक बदल हा केवळ सुविधा देणारा नसतो; तो समाज, प्रशासन आणि राष्ट्रीय सुरक्षेवरही परिणाम करणारा असतो. भारतात व्हॉट्सॲपचे ८५ कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत. वैयक्तिक संवाद, शासकीय कामकाज, उद्योग-व्यवसाय, बँकिंग, शिक्षण आणि आरोग्य अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात या व्हॉट्सॲपचा वापर होतो. त्यामुळे या माध्यमावरील प्रत्येक बदलाचा परिणाम कोट्यवधी नागरिकांवर होणार आहे. आज मोबाईल क्रमांक हा वापरकर्त्याच्या ओळखीशी जोडलेला असल्याने संशयास्पद व्यवहार, आर्थिक फसवणूक किंवा गुन्हेगारी कारवायांचा मागोवा घेणे तुलनेने सोपे ठरते. परंतु केवळ यूजरनेमच्या आधारे संवाद साधण्याची मुभा मिळाल्यास बनावट ओळखी निर्माण करणे, दुसऱ्याची ओळख वापरणे किंवा लोकांची दिशाभूल करणे अधिक सुलभ होऊ शकते. नव्हे तर अशा प्रकारचा वापर सुरू देखील झाला आहे. मोठमोठ्या चित्रपट कलाकार आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या नावाची नोंदणी युजरने म्हणून झाली देखील आहे. केंद्र सरकारने व्यक्त केलेली भीती निराधार नाही. अलीकडच्या काळात 'डिजिटल अटक', फिशिंग, बनावट गुंतवणूक योजना, ऑनलाईन आर्थिक फसवणूक आणि सायबर ब्लॅकमेलिंगच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. अनेक नागरिकांनी लाखो रुपयांची फसवणूक सहन केली आहे. अशा वेळी ओळख लपविण्याची शक्यता वाढविणारे कोणतेही तंत्रज्ञान गुन्हेगारांसाठी नवे साधन ठरू शकते. दहशतवादी कारवाया, संघटित गुन्हेगारी किंवा देशविघातक कारवायांसाठीही अशा सुविधांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा गैरवापर झाल्याची अनेक उदाहरणे देशाने अनुभवली आहेत. नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणात संदेशवहन टेलिग्राम या ॲपचा वापर झाल्याचे समोर आले होते. अनेक गुन्हेगारी टोळ्या आणि सायबर गुन्हेगार एन्क्रिप्टेड प्लॅटफॉर्मचा आधार घेत असल्याचे तपास यंत्रणांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे. त्यामुळे नवीन सुविधा लागू करण्यापूर्वी तिची सुरक्षा आणि कायदेशीर परिणाम यांचा सर्वंकष विचार होणे आवश्यक आहे. दुसरीकडे, व्हॉट्सॲपची भूमिका देखील पूर्णपणे चुकीची म्हणता येणार नाही. सार्वजनिक व्यक्ती, सरकारी संस्था आणि अधिकृत खात्यांच्या नावांचा गैरवापर होऊ नये म्हणून आवश्यक सुरक्षाव्यवस्था उभारल्याचा दावा कंपनीने केला आहे. वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे संरक्षण करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची बाब आहे. अनेकांना आपला मोबाईल क्रमांक अनोळखी व्यक्तींशी शेअर करायचा नसतो. त्यामुळे गोपनीयता आणि सुरक्षितता यांच्यात संतुलन राखणारी व्यवस्था विकसित करणे ही काळाची गरज आहे. या वादातून आणखी एक वास्तव समोर येते. जगातील सर्वाधिक डिजिटल वापरकर्ते भारतात असतानाही देशाकडे व्यापक प्रमाणावर स्वीकारले गेलेले स्वदेशी संदेशवहन व्यासपीठ नाही. परदेशी कंपन्यांच्या व्हॉट्सॲपवर संपूर्ण अवलंबून राहण्यामुळे डेटा, गोपनीयता आणि राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक प्रश्न निर्माण होतात. 'डिजिटल आत्मनिर्भरता' हा केवळ घोषवाक्य न राहता त्यासाठी सक्षम, सुरक्षित आणि विश्वासार्ह भारतीय पर्याय उभारण्याची आवश्यकता आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीला विरोध करण्याचा प्रश्न नाही; मात्र नव्या सुविधा भारतीय कायदे, डेटा संरक्षणाचे नियम आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या निकषांशी सुसंगत असणे अत्यावश्यक आहे. नागरिकांची गोपनीयता जपतानाच गुन्हेगारांना संरक्षण मिळणार नाही, अशी यंत्रणा उभारणे हे सरकार आणि तंत्रज्ञान कंपन्यांचे समान उत्तरदायित्व आहे. सोयीसुविधांच्या स्पर्धेत सुरक्षिततेशी तडजोड परवडणारी नाही. व्हॉट्सॲपचे नवे फिचर लागू करण्यापूर्वी त्याची स्वतंत्र सुरक्षा चाचणी, नियामक तपासणी आणि आवश्यक सुधारणा करणे गरजेचे आहे. डिजिटल भारताचे भविष्य केवळ आधुनिक तंत्रज्ञानावर नव्हे, तर विश्वास, पारदर्शकता आणि मजबूत सायबर सुरक्षेवर अवलंबून आहे.

# जिकडे झाडे, तिकडे पाऊस

एकेकाळी पृथ्वीतलावर झाडांची अमाप संख्या होती. जिकडे बघावे तिकडे नुसती झाडेच झाडे दिसायची. शेतशिवारात फेरफटका मारायला एकट्याने जायचे म्हटल्यावर कोणाचीच हिंमत होत नसे. पूर्ण शेतशिवार झाडांमध्ये लपलेला आणि हिरवळीने नटलेला दिसायचा. निसर्गाचे लाजवाब सृष्टी सौंदर्य पाहून प्रत्येकाचे मन आनंदाने तृप्त होऊन गाणे गायचे. कारण तेव्हा झाडांची एवढी प्रचंड गर्दी पृथ्वीवर आपल्याला पाहायला मिळायची. म्हणून त्याकाळी पाऊस वेळेवर पडायचा आणि वेळेवरच बंद व्हायचा. म्हणजे शेतातील पिकांना पुरेसा पाऊस पडायचा. आताच्यासारखी ना अतिवृष्टी व्हायची, ना कोरडा दुष्काळ पडायचा. शेतातील हिरवळीने नटलेली पिके आनंदाने थुई थुई नाचायची. जोमाने शेतात आलेली पिके पाहून सगळे शेतकरी आनंदाने सुखावून जायचे. प्रत्येक पीक त्या त्या ऋतूमध्ये काढले जायचे. धरणीमाय सुद्धा काढणीला शेतकऱ्यांना भरपूर बरकत द्यायची. म्हणून सगळे शेतकरी बांधव आनंदात असायचे. गुण्यागोविंदाने आपला घर प्रपंच चालवायचे. त्याकाळी शेतकऱ्यांवर कधीच वाईट दिवस आले नाहीत. शेतकरी आत्महत्येचे प्रमाण त्याकाळी शून्य होते. सांगायचा मुद्दा असा की, त्याकाळी सगळीकडे झाडेच झाडे असायची म्हणून पाऊसही दमदार पडायचा आणि सगळा शेत शिवार ओलाचिंब करून टाकायचा. नद्या, नाले, ओढे, तलाव आणि विहिरी ओसंडून वाहायच्या. तेव्हाचा पाऊस कहरही करत नव्हता आणि पिकांना अपुराही पडत नव्हता. म्हणजे शेतीला पुरेसा पाऊस पडायचा. म्हणून शेती सुद्धा उत्तम पिकायची आणि धनधान्याने शेतकऱ्यांची ओटी भरायची.



आता शेतकऱ्यांवर अतिशय वाईट दिवस आले आहेत. शेतकऱ्यांच्या नशिबात एक तर ओला दुष्काळ आहे, नाहीतर कोरडा दुष्काळ आहे. पाऊस नाही पडला तरीही पिकांचे नुकसान आणि पाऊस पडला तरीही पिकांचे नुकसान. सांगायची बाब अशी की, अतिवृष्टी आणि दुष्काळ या दोन्हींच्या कचाट्यात आज बळीराजा अडकला आहे. आता पावसाला मोसमी पाऊस म्हणता येणार नाही. कारण आता उन्हाळ्यात पावसाळा आणि पावसाळ्यात हिवाळा असे ऋतुचक्र बनले आहे. पावसाला ऋतुचक्राचा ठराविक काळ राहिलाच नाही. कोणत्याही ऋतूत बरसत आहे आणि जेव्हा पावसाची गरज आहे, नेमका त्याच काळात लपून बसत आहे. असे भयावह चित्र सध्या आपल्याला सर्वत्र पाहायला मिळत आहे. आणि याला कारणीभूत दुसरे तिसरे कोणी नसून आपणच आहोत. आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. कारण लोकसंख्या वाढत गेली आणि लोकांना राहण्यासाठी जागा कमी पडू लागली. म्हणून माणसांनी स्वतःच्या भल्यासाठी मोठमोठे जंगले नष्ट करून त्या ठिकाणी प्लॉटिंग पाडली आणि मोठमोठ्या इमारती, कारखाने, विविध उद्योगधंदे, वाड्या आणि तांडे उभे करून जंगलाची जागा माणसांनी घेतली आणि एकेकाळी हिरवागार दिसणारा निसर्ग आता भकास, उजाड आणि विद्रूप दिसू लागला. झाडांची कमी होणारी संख्या याचा परिणाम थेट ऋतुचक्रावर झाला. सगळे ऋतुचक्र बदलून गेले. म्हणून आता पाऊस वेळेवर पडत नाही. पडला तरीही अवकाळी पडतो. नाहीतर पडत सुद्धा नाही. याचे एकमेव कारण म्हणजे अमाप झाडांची होणारी कत्तल आणि त्यातून कमी होणारी झाडांची संख्या याला कारणीभूत आहे.


सध्या महाराष्ट्राच्या काही भागात म्हणावा तसा पाऊस बरसत नाही. परंतु जिकडे अमाप झाडे आहेत, तिकडे मात्र मुसळधार पाऊस पडत आहे. आणि सगळ्या शेतशिवारात पाणीच पाणी होत आहे. कारण म्हणजे, झाडे आणि पाऊस यांचा अतिशय घनिष्ट आणि परस्पर पूरक असा संबंध आहे. झाडे त्यांच्या मुळांद्वारे जमिनीत पाणी मुरवतात आणि बाष्पोत्सर्जन प्रक्रियेद्वारे ते पाणी बाष्पाच्या रूपात हवेत सोडतात आणि नंतर हे बाष्प हवेत वर जाऊन ढग बनवतात आणि त्यामुळे चांगला पाऊस पडण्यास मदत होते. आता हल्ली झाडांची संख्या खूपच कमी झाली आहे, आणि आता याचा परिणाम थेट ऋतुचक्रावर झाला आहे. सगळे ऋतुचक्र बिघडून गेले आहे. आणि जिकडे झाडे आहेत, तिकडे मात्र पाऊस चांगला बरसत आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांचे खूप हाल-हाल होत आहेत. शेतात पेरणी करूनही पाऊस पडत नसल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. पाण्याविना मुक्या जनावरांचे प्रचंड हाल होत आहेत. केवळ शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी पुर्णपणे आतून बाहेरून खचले आहेत. घर प्रपंच चालवणे आणि त्यासाठी सावकाराचे कर्ज काढणे शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी झाली आहे. शेतकरी आभाळाकडे पाहत पावसाची वाट बघत आहेत. आभाळ येत आहे, आकाशात काळेकुट्ट ढग जमा होत आहेत. विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट होत आहे, मात्र पाऊस काही पडत नाही आणि शेतकऱ्यांच्या आशा काही पल्लवीत होत नाहीत. शेतकरी हवालदिल होऊन कर्जाचा डोंगर आणि संसाराचा भार पेलवत नसल्यामुळे आत्महत्या करून स्वतःची जीवन यात्रा संपवत आहेत. हल्ली शेतकरी आत्महत्येचे सत्र वेगाने चालूच आहे. देशात शेतकरी आत्महत्या हा विषय अतिशय गंभीर आहे. रोज कुठे ना कुठेतरी शेतकरी आत्महत्या करतोच आणि आपली जीवनयात्रा संपवतोच!

अशा दुर्दैवी घटनांना आळा घालायचा असेल तर आता सगळ्यांनी एकत्र येऊन आणि मनावर घेऊन असा निर्धार करायला हवा की, मी आता इथून पुढे एकही झाड तोडणार नाही आणि दुसऱ्यांनाही तोडू देणार नाही. जर कोणी तोडतच असेल तर त्याला झाडाचे महत्त्व समजावून सांगेल किंवा तो ऐकण्यास तयार नसेल तर त्याला पोलिसांच्या स्वाधीन करेल. असा पक्का निर्धार करून प्रत्येकाने खूप खूप झाडे लावावेत, झाडांचे संगोपन करावे आणि वृक्षतोड करणाऱ्यास कडक शासन करायला हवे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षकांनी झाडांचे महत्त्व पटवून द्यायला हवे. आज आपल्यावर जी वाईट वेळ आलेली आहे, ती केवळ वृक्षतोड केल्यामुळेच.

म्हणून प्रत्येकाने झाडांचे मोल जाणून घ्यावे आणि वृक्षतोड केल्यास त्याचे काय परिणाम होतात हे देखील माहिती करून घ्यावे. आणि शेतात, रोडच्या कडेने, मोकळ्या जागेत, रानातील बांधावर, स्मशानभूमीत झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, त्यांची खूप खूप काळजी घ्यावी, जिकडे झाडे, तिकडे पाऊस ही म्हण लक्षात घ्यावी आणि भकास, उजाड आणि विद्रूप झालेला निसर्ग पुन्हा एकदा हिरवळीने नटूवूया...आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आनंदाची मंगलमय पहाट आणूया.

**- बुद्धभूषण कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर, जि. लातूर
मो. ७४९८७१५६६१

# शिक्षणातील सांस्कृतिक दिशा




भारत हा विविध भाषा, धर्म, परंपरा आणि संस्कृतींचा देश आहे. या वैविध्यातूनच देशाची खरी ताकद निर्माण झाली आहे. मात्र शिक्षण व्यवस्थेत हे वैविध्य अनेकदा पुरेशा प्रमाणात प्रतिबिंबित होत नाही. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकांतील ज्ञान देण्यापेक्षा विविध संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्यांची ओळख करून देणारे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ) २०२० ने याच दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. बहुभाषिक शिक्षण, स्थानिक ज्ञानपरंपरा आणि जागतिक नागरिकत्व या संकल्पनांना केंद्रस्थानी ठेवून भारतीय शिक्षण अधिक समावेशक करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात विविध संस्कृतींशी संवाद साधण्याची क्षमता प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये विकसित होणे आवश्यक आहे. शाळा ही केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्याचे केंद्र नसून समाज घडविण्याची प्रयोगशाळा आहे. वर्गखोलीत विविध सामाजिक, भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांना समान संधी मिळाल्यास परस्पर आदर, सहिष्णुता, संवेदनशीलता आणि सहकार्याची भावना विकसित होते. अशा वातावरणात विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही अधिक सक्षम बनतात.

भारतीय राज्यघटनेने कलम १४ आणि शिक्षणाचा अधिकार देणाऱ्या कलम २१-अ अंतर्गत समान संधीची हमी दिली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानेही भारतीय भाषा, लोककला, आदिवासी परंपरा आणि स्थानिक इतिहासाला अभ्यासक्रमात स्थान देण्याचा आग्रह धरला आहे. यामुळे मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या समाजघटकांतील विद्यार्थ्यांनाही आपली संस्कृती आणि ओळख अभिमानाने मांडण्याची संधी मिळू शकते. शिक्षणातील ही समावेशकता सामाजिक न्यायाच्या दिशेनेही महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

मात्र या संकल्पनेची अंमलबजावणी सोपी नाही. भारतातील भाषिक विविधता, सामाजिक पूर्वग्रह, परीक्षाकेंद्रित शिक्षणपद्धती आणि समावेशक शिक्षणासाठी प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता ही मोठी आव्हाने आहेत. अनेक शाळांमध्ये स्थानिक संस्कृतीपेक्षा केवळ ठरावीक अभ्यासक्रमावर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा त्यांच्या परिसराशी आणि सांस्कृतिक मुळांशी असलेला संबंध कमकुवत होतो. शिक्षण हे वास्तव जीवनाशी जोडले गेले नाही, तर त्याची परिणामकारकता कमी होते.

या अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. स्थानिक उदाहरणांवर आधारित अध्यापन, विविध भाषांचा सन्मान, प्रकल्पाधारित शिक्षण आणि डिजिटल माध्यमातून विविध राज्यांतील तसेच विविध देशांतील विद्यार्थ्यांशी संवाद अशा उपक्रमांना चालना देणे आवश्यक आहे. पालक, स्थानिक कलाकार, साहित्यिक आणि समाजातील जाणकार व्यक्तींनाही शाळांच्या सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक समृद्ध होईल.

जगभरातील अनेक देश विद्यार्थी देवाणघेवाण, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम आणि ऑनलाइन संवादाच्या माध्यमातून सांस्कृतिक समज वाढविण्याचा प्रयत्न करत आहेत. भारतानेही आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविण्याची गरज आहे. स्थानिकतेपासून जागतिकतेकडे जाणारा हा प्रवास शिक्षणाच्या माध्यमातूनच शक्य आहे.

अभ्यासक्रमात प्रादेशिक इतिहास, लोकसाहित्य, आदिवासी समाजाचे योगदान, स्थानिक कला आणि विविध भाषांचा समावेश वाढविणे ही आता अपरिहार्यता आहे. शिक्षण केवळ गुण मिळविण्यापुरते मर्यादित न राहता समाजातील विविधतेचा स्वीकार करणारे आणि लोकशाही मूल्यांना बळ देणारे असावे. बहुसांस्कृतिक शिक्षण ही केवळ शैक्षणिक सुधारणा नसून सामाजिक ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता आणि जागतिक नागरिकत्व घडविण्याचा प्रभावी मार्ग आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने योग्य दिशा दाखविली असली, तरी त्याचे यश प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. सरकार, शिक्षक, पालक आणि समाज या सर्वांनी मिळून विद्यार्थ्यांमध्ये विविधतेचा आदर, समानतेची भावना आणि मानवतेची मूल्ये रुजवली, तरच भारताची शिक्षणव्यवस्था खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक आणि भविष्याभिमुख ठरेल.

**-प्रा. सु. ग. जाधव**
नांदेड
मो. ९४२३१४०७४१

# रेशीम शेतीचा यशस्वी प्रयोग : दीड एकरातून ५ ते ६ लाखांचे उत्पन्न

## मांजरमचे भुजंग बापुराव शिंदे यांनी केली प्रेरणादायी रेशीमशेती

बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च आणि पारंपरिक शेतीतील अनिश्चित उत्पन्न या आव्हानांवर मात करत नायगाव तालुक्यातील मांजरम येथील प्रगतिशील शेतकरी भुजंग बापुराव शिंदे यांनी रेशीम शेतीचा यशस्वी प्रयोग करून आर्थिक समृद्धीचा नवा मार्ग शोधला आहे. अवघ्या दीड एकर क्षेत्रात रेशीम शेती करून ते आज दरवर्षी सुमारे ५ ते ६ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत असून परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहेत.

भुजंग शिंदे यांच्याकडे एकूण १५ एकर बागायती शेती आहे. अनेक वर्षे ते पारंपरिक पिकांची लागवड करत होते. मात्र, हवामानातील बदल, पावसाचा लहरीपणा, वाढता उत्पादन खर्च आणि कमी नफा यामुळे शेतीची आर्थिक शाश्वतता कमी होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे नियमित आणि अधिक उत्पन्न देणाऱ्या शेती व्यवसायाचा त्यांनी शोध सुरू केला.

या काळात त्यांनी जिल्हा रेशीम अधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपर्क साधून रेशीम शेतीबाबत सविस्तर माहिती घेतली. कार्यालयामार्फत तुती लागवड, रेशीम किड्यांचे संगोपन, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन, रोग नियंत्रण आणि उत्पादन तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन मिळाले. या तांत्रिक मार्गदर्शनामुळे प्रेरित होऊन त्यांनी सन २०१८-१९ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर दीड एकर क्षेत्रात तुतीची लागवड करून रेशीम शेतीला सुरुवात केली.

सुरुवातीपासूनच त्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने रेशीम किड्यांचे संगोपन केले. तुतीच्या बागेचे योग्य व्यवस्थापन, वेळेवर किड्यांचे पालन आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार नियोजन केल्यामुळे त्यांना सातत्याने चांगले उत्पादन मिळू लागले. सध्या ते दर २० ते ३० दिवसांनी एक बॅच तयार करतात. वर्षभरात ७ ते ८ बॅचचे उत्पादन घेऊन त्यातून वार्षिक ५ ते ६ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत आहेत.

रेशीम शेतीमुळे त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. शेतीमधून नियमित रोख उत्पन्न मिळू लागल्याने शेतीवरील गुंतवणूक वाढविणे, आधुनिक साधनांचा वापर करणे आणि भविष्यातील नियोजन करणे अधिक सुलभ झाले आहे.



भुजंग शिंदे या युवा शेतकऱ्यांने आई, वडील व पत्नीच्या मदतीने शेतीची कामे पूर्ण करतात. त्यांच्या या यशामुळे परिसरातील अनेक शेतकरी रेशीम शेतीविषयी माहिती घेण्यासाठी त्यांच्या शेताला भेट देत आहेत. ते शेतकऱ्यांना रेशीम शेतीतील संधी, वैज्ञानिक पद्धती आणि शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शनही करतात.

शिंदे सांगतात, रेशीम शेती ही नियमित उत्पन्न देणारी आणि कमी क्षेत्रातही फायदेशीर ठरणारी शेती आहे. जिल्हा रेशीम अधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनामुळे मला योग्य दिशा मिळाली. मेहनत, नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास कोणताही शेतकरी या व्यवसायात यशस्वी होऊ शकतो.

रेशीम शेतीसाठी शासनामार्फत विविध योजनांद्वारे तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण तसेच पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध असलेल्या अनुदानाचा लाभ घेता येतो. त्यामुळे उत्पन्न वाढविण्याची इच्छा असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील रेशीम अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून या व्यवसायाचा अवलंब करावा, असे त्यांनी सांगितले आहे.

भुजंग बापुराव शिंदे यांची यशोगाथा ही आधुनिक, वैज्ञानिक आणि उत्पन्नवाढीला चालना देणाऱ्या शेतीचा प्रेरणादायी आदर्श असून, बदलत्या कृषी परिस्थितीत रेशीम शेती हा शाश्वत पर्याय ठरू शकतो, याचे ती उत्तम उदाहरण आहे.

**-अलका पाटील**
उपसंपादक
जिल्हा माहिती कार्यालय,
नांदेड

# राष्ट्रीय महामार्गावरील लांडगेवाडी येथील बोगदा म्हणजे असून ओळंबा नसून खोळंबा

## गावकऱ्यांना करावा लागतो अनेक समस्यांचा सामना






**लोहा (प्रतिनिधी)–** नांदेड - लातूर राष्ट्रीय महामार्गावरील व लोहा तालुक्यातील मौजे लांडगेवाडी येथील बोगदा म्हणजे असून ओळंबा नसून खोळंबा याप्रमाणे झाला आहे. त्यामुळे गावकऱ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. तेव्हा या प्रकरणी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी तत्काळ लक्ष द्यावे, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

नांदेड - लातूर राष्ट्रीय महामार्गावरील व लोहा तालुक्यातील मौजे लांडगेवाडी येथे गावकऱ्यांना रहदारीची व्यवस्था व्हावी अपघात होऊ नयेत म्हणून लांडेवाडीचे सरपंच बाळासाहेब टोपारे व गावकऱ्यांनी बोगद्याची मागणी केली होती. त्या मागणीनुसार बोगदा करण्यात आला, पण सदरील काम व्यवस्थित झाले नाही असा आरोप गावकऱ्यांनी केला.

येथील बोगद्यातील चिखलामुळे विद्यार्थ्यांना ये-जा करता येत नाही. या बोगद्यावरील नाली बांधकाम चुकीचे झाले आहे. नालीचे पाणी बोगद्यात येत असल्यामुळे रहदारीस मोठी अडचण होत आहे.

येथील सर्व्हिस रोडही व्यवस्थित झाला नाही. या बोगद्यावरील लाईट बंद आहे. या बोगद्याच्या बाजूला असलेल्या अण्णाराव गुणाजी लांडगे, संतोष माणिकराव सोलापुरे, माणिक संभाजी टोपारे, सदाशिव नरबा लांडगे यांच्या घराची जमीन भूसंपादन केली आहे, पण अद्यापपर्यंत त्यांना मावेजा मिळाला नाही व त्यांना शासनाने मावेजा देऊन कामाची रूंदी वाढवावी, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

यावेळी प्रतिक्रिया देताना लांडगेवाडीचे सरपंच बाळासाहेब टोपारे म्हणाले की, लांडगेवाडी येथील राष्ट्रीय महामार्गावरील बोगद्याचे अपूर्ण काम झाले आहे. याबाबत संबंधित अभियंत्याला काम पूर्ण करा म्हणून वांरवांर सांगितले, पण ते उडवाउडवीची उत्तरे देत आहेत.

# कृषीदिनानिमित्त हरित नांदेड अभियानांतर्गत वृक्षारोपण



**नांदेड (प्रतिनिधी)–** हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, क्षेत्रीय कार्यालय क्र. १ (तरोडा-सांगवी) व वृक्षमित्र फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ नगरी, सांगवी येथे मोठ्या उत्साहात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.

प्रत्येक घराच्या परिसरात किमान एक झाड आणि शेताच्या बांधावर वृक्षवल्ली लावून समृद्धी फुलवा, हा स्व. वसंतराव नाईक यांचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पर्यावरण जनजागृती व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी महापौर कविता मुळे यांनी सांगितले की, ही वृक्षलागवड १०० दिवसांच्या विशेष अभियानाचा भाग असून पावसाअभावी हा उपक्रम पुढे ढकलण्यात आला होता. आता तो पूर्ण करण्यात येत आहे. लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाचे किमान एक वर्ष संगोपन करण्याची जबाबदारी सर्वांनी स्वीकारावी. वृक्षसंवर्धनामुळे भविष्यातील ग्लोबल वॉर्मिंगचे दुष्परिणाम कमी करण्यास निश्चितच मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. या वर्षी लागवड करण्यात आलेल्या झाडांचा पुढील वर्षी वाढदिवस साजरा करू, असे बोलताना महापौर यांनी सांगितले.

आयुक्त डॉ. महेश डोईफोडे यांनी 'हरित नांदेड'चा संकल्प व्यक्त करत महानगरपालिका क्षेत्रात किमान १८ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्याच्या सूचना दिल्या. तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने महानगरपालिकेच्या मोकळ्या जागा, उद्याने व रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

प्रस्तुत कार्यक्रमात याही वर्षी जागतिक पर्यावरण दिनापासून शहरात मनपा व १८ सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हरित नांदेड अभियान राबविले जात आहे.

या अभियानात इतर वृक्ष लागवडीसोबत लोकसहभागातून मनपा क्षेत्रातील वीस प्रभागांत प्रत्येकी ५० मोठी पर्यावरणपुरक झाडे ट्री गार्डसह लागवडीचे नियोजन करण्यात आले असून, ट्री गार्ड लोकसहभागातून देणगी स्वरूपात घेण्यात येणार आहे. रोपे व इतर सर्व व्यवस्था महानगरपालिकेमार्फत केली जाणार आहे. या उपक्रमाची संपूर्ण माहिती वृक्षमित्र फाऊंडेशनचे संतोष मुगटकर यांनी दिली.

उद्यान अधीक्षक तथा क्षेत्रीय अधिकारी मिर्झा फराहतुल्लाह बेग यांनी या वर्षीच्या वृक्ष लागवडीच्या नियोजनाबाबत सर्वांना माहिती दिली. महापौर प्रतिनिधी संतोष मुळे यांचा जन्मदिवस वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास महापौर कविता मुळे, आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, माजी उपमहापौर तथा नगरसेवक सतीश देशमुख, उद्यान अधीक्षक तथा सहायक आयुक्त फरहतुल्ला मिर्झा बेग, सहायक आयुक्त निलावती डावरे, वृक्षमित्र संतोष मुगटकर, सरस्वती राऊत, रमेश चवरे, रावण सोनसळे, राजेश जाधव, संतोष मुळे, गजानन देशमुख, संतोष जिंतूरकर, श्याम कानोटे, राजू जोरवर, रमेश ढोले, शिवकांता स्वामी, सुरेखा टाकळीकर तसेच वृक्षमित्र फाऊंडेशनचे वृक्षमित्र शैलेंद्र क्षीरसागर, रवी रणखांब, डॉ. पुष्पा कोकीळ, सुधाकर चेरुकुला, चैतन्य पिंपळडोहकर, योगगुरू सिताराम सोनटक्के, महेश सोमनवार व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक, वृक्षप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहेबराव ढगे यांनी केले, तर आभार विठ्ठल तिडके यांनी मानले.

# 'अमृत' संस्थेतर्फे ग्रामीण भागात 'ईव्ही चार्जिंग स्टेशन' उभारणीचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) च्या वतीने ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ग्रामीण व निमशहरी भागात उद्योजकतेला चालना देण्यासाठी 'अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन' उभारणीची योजना सुरू करण्यात आली असून, यासाठी जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांकडून अर्ज व नोंदणीचे आवाहन करण्यात आले आहे. हा उपक्रम 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' मधील एका अभिमानास्पद प्रवासाचा भाग आहे.

जिथे ऊर्जा हरित... तिथे भविष्य सुरक्षित, आणि ग्रीन एनर्जी, ग्रीन अर्थ, आपले भविष्य सुरक्षित अर्थ हे ब्रीद घेऊन ही योजना राबवली जात आहे. भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता ग्रामीण भागात चार्जिंग पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि त्याद्वारे स्थानिक युवकांना हक्काचा व्यवसाय मिळवून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**ईव्ही चार्जिंग स्टेशनचे महत्त्व आणि फायदे**

**पर्यावरण आणि इंधन बचत:** या स्थानकांमुळे कार्बन उत्सर्जन कमी होऊन हवा स्वच्छ राहण्यास मदत होईल. तसेच पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व कमी होऊन वाहनधारकांच्या खर्चात मोठी बचत होईल.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी:** ग्रामीण भागात हे चार्जिंग स्टेशन सुरू झाल्याने नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल.

**शासनाचा भक्कम पाठिंबा:** शासकीय योजना, आकर्षक अनुदान (सबसिडी) आणि प्रोत्साहनामुळे या व्यवसायातील गुंतवणूक सुरक्षित राहील आणि कमी जोखमीमध्ये अधिक नफा मिळवणे शक्य होईल.

# सिडकोत मातंग समाजाच्यावतीने आंदोलन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणाला विरोध करणारे काँग्रेस नेते आ. नाना पटोले व आ. विजय वडेट्टीवार यांचा सिडको येथे मातंग समाजाच्या वतीने अण्णा भाऊ साठे स्मारक येथे जोडेमारो आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्रातील मातंग समाजाची गेल्या अनेक दशकांपासून अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण व्हावे ही मागणी आहे. त्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्णयाद्वारे महाराष्ट्र लगतच्या तेलंगणा व कर्नाटक राज्यांमध्ये अनुसूचित जातीमध्ये आरक्षणाचे उपवर्गीकरण झाले असून, महाराष्ट्रातही उपवर्गीकरण व्हावे याबाबत मा. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती बदर यांच्या अध्यक्षतेखाली बदर आयोग गठीत करण्यात होता. बदर आयोगाने आपला अहवाल शासनाकडे सादर केला आहे. त्यावरून उपवर्गीकरण होईल आणि मातंग समाजाला न्याय मिळेल असे महाराष्ट्रातील तमाम मातंग समाजाला वाटत असताना महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते आ. नाना पटोले व आ. विजय वडेट्टीवार यांनी सभागृहामध्ये अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शविला आहे. यामुळे महाराष्ट्रातील तमाम मातंग समाजामध्ये काँग्रेस व काँग्रेस नेत्यांविरुद्ध असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा रोष म्हणून सिडको नवीन नांदेड येथील सकल मातंग समाजाने काँग्रेस नेते आ. नाना पटोले व आ. विजय वडेट्टीवार यांचा तीव्र निषेध करत त्यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन केले आहे.

याप्रसंगी भाजपा अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष जनार्दन गुपिले, माधव डोम्पले, अंकुश गायकवाड, गटाचे पप्पू गायकवाड, दशरथ कंधारे, आनंदा गायकवाड, रमेश तालीमकर, आनंदा गायकवाड, सुरेश कांबळे, आनंदा वाघमारे दापशेडकर, अंबादास मेकाले, महादेव गवाले, विकास जगदळे, चंदू कांबळे, सचिन मांजरमकर, पप्पू कांबळे राऊतखेडकर, प्रवीण ढाकणीकर, साईनाथ घोसले, आनंदा झुंजारे, सूर्यकांत शिंदे, निवृत्ती वाघमारे, विजय मात्रे, एकनाथ गायकवाड, ज्ञानेश्वर नवघरे, कपिल कांबळे, रघुनाथ अंभोरे, विश्वंभर गवाले, बालाजी रोडेकर, मारुती कांजाळकर यांच्यासह समाजातील असंख्य ज्येष्ठ व युवा मंडळी उपस्थित होती.

# शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी मराठवाडा शिक्षक संघाचे धरणे आंदोलन




**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने भर पावसात शुक्रवारी धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्ह्यातील अनेक शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शासनाने शिक्षकांच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या प्रलंबित सेवाविषयक बाबी, रिक्त पदे भरणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, शंभर टक्के अनुदान मिळणे, BLO व SIR कामातून मुक्त करून विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी वेळ देणे, १०.२०.३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, शिक्षकांची अशैक्षणिक कामातून मुक्तता करणे, पदोन्नती प्रक्रिया गतिमान करणे, अनुदान, वेतनातील विसंगती दूर करणे, तसेच इतर प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी केली.

# अल्पसंख्याक काँग्रेस तालुकाध्यक्षपदी सय्यद मन्नान यांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** हिमायतनगर तालुका अल्प-संख्याक काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ते व पत्रकार सय्यद मन्नान यांची महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नियुक्ती केली आहे.

माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आल्याने तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी सय्यद मन्नानभाई यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# तंत्रशिक्षण मंडळाच्या निकालात ग्रामीण टेक्निकल कॅम्पसचे यश

## संस्थेचा ९५.४२ % निकाल; तीन विभागांचा १००% निकाल, ३०६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांच्या उन्हाळी परीक्षा २०२६ चा निकाल मंडळातर्फे नुकताच जाहीर झाला असून, ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड संस्थेच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. संस्थेच्या अंतिम वर्षाचा एकूण निकाल ९५.४२ टक्के लागला असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा संस्थेने पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

पॉलिटेक्निक पदविकेसाठी यंदा अंतिम वर्षाच्या परीक्षेस ४२४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ४०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ३०६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य तर १०३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा बहुमान मिळविला आहे. संस्थेच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग, डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी तसेच वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान या तीन विभागांनी १००% निकाल संपादन करीत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. याशिवाय संगणक अभियांत्रिकी विभागाचा निकाल ९८.३२ टक्के, स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचा ९३%, यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचा ९०.३२%, तर विद्युत अभियांत्रिकी विभागाचा ८६.३० % एवढा निकाल लागला आहे.

द्वितीय वर्षाच्या निकालातही संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले असून, डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी विभागाने यातदेखील १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. संस्था स्तरावर संगणक अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षातील विद्यार्थिनी वैष्णवी विक्रम माहुरकर हिने ९४.०६ % गुणांसह संस्थेतून प्रथम क्रमांक पटकावला आहे तर सिमरन अक्सा फैज मुजतबा शेख हिने ९२.५३% गुणांसह द्वितीय, तर यश्वी नाथानी हिने ९२.३५% गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच संगणक विभागाची द्वितीय वर्षातील प्राप्ती संतोषकुमार आळंदकर हिने ८९.७६% गुणांसह प्रथम, स्नेहल अशोक गंगासागरे हिने ८८.७१ % गुणांसह द्वितीय, तर साक्षी भुतडा हिने ८८.१२ % गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेत संस्थेस नावलौकिक प्राप्त करून दिला आहे, त्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

तसेच प्रथम वर्षात प्रगती वासमवार हिने ९०.२४ टक्के गुणांसह प्रथम, अंकिता दत्ता शाहापूरे हिने ९० टक्के गुणांसह द्वितीय, तर सर्वज्ञ तानाजी हुसेकर याने ८८.४४ % गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संकुल संचालक डॉ विजय पवार, प्राचार्य डॉ प्रभुलिंग उल्लागड्डी, प्राचार्या सौ शिल्पा मुळे, उपप्राचार्य संजय देऊळगावकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी मंडळाच्या परीक्षेत मिळविलेले हे घवघवीत यश म्हणजे संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षण-प्रशिक्षण देण्यासाठी संस्थेने घेतलेल्या कठोर परिश्रमाचे हे फलित असल्याचे मत संचालक डॉ. विजय पवार यांनी व्यक्त केले.

# मनपाच्या सिडको मातृसेवा आरोग्य केंद्र अंतर्गत ७२३२ बालकांना पल्स पोलिओ लस



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक पल्स पोलिओ लसीकरण अंतर्गत मनपाच्या सिडको मातृ सेवा आरोग्य केंद्र अंतर्गत २२ केंद्रांवर वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे, डॉ. मनिषा बदने यांच्या मार्गदर्शनाखाली ७२३२ बालकांना पल्स पोलिओ लस देण्यात आली.

जागतिक पल्स पोलिओ लसीकरण अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या अधिपत्याखाली २८ जून रोजी आरोग्य विभागाचे उपायुक्त अजितपाल संधू, मनपाचे डॉ. रिठे, सिडको मातृ सेवा आरोग्य केंद्राचे डॉ. संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, आरोग्य सहायक एस. एम. आरगुलवार, परिचारिका प्रियंका रच्चेवार, मीनाक्षी शिंदे, औषध निर्माण अधिकारी ओंकार सूर्यवंशी, आरोग्य सेवक व्ही. एन. गलपवाड, परिचारिका जयश्री दरेगावे, गोविंद क्षीरसागर, सेवक, सर्व आशा वर्कर्स यांनी पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभाग नोंदविला.

भाजपा नगरसेविका तथा आरोग्य समिती सदस्य सौ. सुवर्णा सतिश बसवदे यांनी मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे भेट दिली. सकाळी ८ ते ५ दरम्यान २२ केंद्रांवर ७२३२ बालकांना पल्स पोलिओ लसीकरण करण्यात आले.

# विश्वनाथ होळगे यांना महाराष्ट्र शासनाचा कृषीभूषण पुरस्कार जाहीर



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील मौजे दापशेड येथील विश्वनाथ गोविंदराव होळगे यांची महाराष्ट्र शासनाचा कृषीभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.


याबद्दल त्यांचा लोहा तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांचे वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी लोहा तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासारळे, उपकृषी अधिकारी लक्ष्मण हांडे, उपकृषी अधिकारी कापशीकर, अमर पाटील, सहायक कृषी अधिकारी एस. पी. सोनवळे व कर्मचारी उपस्थित होते.

# गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगचा १०० टक्के निकाल, नोकरीची हमी







**नांदेड (प्रतिनिधी)–** गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगने यंदाही आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा झेंडा उंचावत बी. कॉम. बँकिंग तृतीय वर्षाचा तब्बल शंभर टक्के निकाल लावून अभिमानास्पद यश मिळवले आहे. केवळ निकालातच नव्हे, तर विद्यार्थ्यांना दिलेल्या १०० टक्के रोजगार हमीचे वचनही यशस्वीरित्या पूर्ण करत महाविद्यालयाने शिक्षणासोबत करिअर या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवले आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या यंदाच्या निकालात गोदावरी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सिद्ध करत अव्वल स्थान पटकावले. शिवकन्या पावडे हिने ९.२६ सरासरी गुणांसह प्रथम क्रमांक मिळवून कॉलेजचा मान उंचावला. निलेश अडकिने ९.२४ द्वितीय, तर प्रतीक्षा वाठोरे ९.२३ हिने तृतीय क्रमांक मिळवत आपली प्रतिभा सिद्ध केली. या तिन्ही विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी घेतलेली दूरदृष्टीही तितकीच उल्लेखनीय आहे. बी. कॉम. बँकिंगमध्ये प्रवेश घेताना दिलेली नोकरीची हमी प्रत्यक्षात उतरवण्यासाठी विद्यार्थ्यांना निकाल जाहीर होण्यापूर्वीच इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यानंतर आयोजित मुलाखतींमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना नामांकित वित्तीय संस्थांकडून ऑफर लेटरही प्रदान करण्यात आले. त्यामुळे शिक्षण पूर्ण होताच विद्यार्थ्यांच्या करिअरला ठोस दिशा मिळाली आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, प्रत्यक्ष अनुभव देणाऱ्या इंटर्नशिप आणि खात्रीशीर रोजगार या चौघांचा संगम साधत गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगने विद्यार्थ्यांचा विश्वास जिंकला आहे. सातत्यपूर्ण उत्कृष्ट निकाल आणि विद्यार्थीकेंद्रीत उपक्रमांमुळे महाविद्यालयाची विश्वासार्हता अधिक बळकट होत आहे.

संस्थेच्या अध्यक्षा राजश्री पाटील यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत उज्ज्वल करिअर घडविण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत, असे सांगितले.

दरम्यान, संस्थापक व आ. हेमंत पाटील यांनी या यशाबद्दल अध्यक्षा राजश्री पाटील, संचालक अजय झरकर तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील राहील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे तालुक्याच्या ठिकाणी शिकाऊ व पक्के अनुज्ञप्ती शिबिराचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे शिकाऊ व पक्के अनुज्ञप्तीसाठी माहे जुलै ते डिसेंबर २०२६ या महिन्यात तालुका शिबीर कार्यालयाचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी जागा उपलब्धतेच्या आधीन राहून ऑनलाईन अपॉईटमेंट महिना सुरुवात होण्याच्या ५ दिवस आधी कार्यालयीन वेळेत सुरु करण्यात येईल. तरी अपॉईटमेंट घेतलेल्या अर्जदारांनी याची नोंद घेवून शिबीर कार्यालयास उपस्थित राहावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांतराव साळी यांनी केले आहे.

तालुकानिहाय कॅम्पचे ठिकाण व दिनांक पुढीलप्रमाणे आहे. कंधार येथे ३ जुलै, ३ ऑगस्ट, ३ सप्टेंबर, ५ ऑक्टोबर, ३ नोव्हेंबर, २ डिसेंबर २०२६ या दिवशी आहे. धर्माबाद येथे ६ जुलै, ६ ऑगस्ट, ७ सप्टेंबर, ७ ऑक्टोबर, ५ नोव्हेंबर, ४ डिसेंबर २०२६ दिवशी आहे. किनवट ९ जुलै, १० ऑगस्ट, ९ सप्टेंबर, ९ ऑक्टोबर, १२ नोव्हेंबर, १० डिसेंबर २०२६ या दिवशी आहे. मुदखेड येथे १३ जुलै, १३ ऑगस्ट, ११ सप्टेंबर, १२ ऑक्टोबर, १६ नोव्हेंबर, १४ डिसेंबर यादिवशी आहे. माहूर येथे १६ जुलै, १७ ऑगस्ट, १६ सप्टेंबर, १६ ऑक्टोबर, १८ नोव्हेंबर, १६ डिसेंबर या दिवशी आयोजन करण्यात येणार आहे. हदगांव येथे २० जुलै, २० ऑगस्ट, २१ सप्टेंबर, २१ ऑक्टोबर, २० नोव्हेबर, २१ डिसेंबर यादिवशी आहे. धर्माबाद येथे २३ जुलै, २५ ऑगस्ट, २४ सप्टेंबर, २३ ऑक्टोबर, २५ नोव्हेंबर, २३ डिसेंबर या दिवशी आहे. हिमायतनगर येथे २७ जुलै, २७ ऑगस्ट, २८ सप्टेंबर, २८ ऑक्टोबर, २७ नोव्हेंबर, २८ डिसेंबर २०२६ या दिवशी आहे. किनवट येथे ३० जुलै, ३१ ऑगस्ट, ३० सप्टेंबर, ३० ऑक्टोबर, ३० नोव्हेंबर, ३० डिसेंबर २०२६ या दिवशी आयोजन करण्यात आले आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# Arattai मध्येही यूजरनेम फीचर बंद

## झोहोचे संस्थापक श्रीधर वेम्बू यांची घोषणा

**भारत सरकारने सुरक्षेच्या कारणास्तव WhatsApp च्या 'यूजरनेम' फीचरच्या अंमलबजावणीवर स्थगिती दिल्यानंतर आता स्वदेशी तंत्रज्ञान कंपनी Zoho नेही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कंपनीचे संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी त्यांच्या Arattai या मेसेजिंग अ‍ॅपमधील यूजरनेम-आधारित खाते (Username-based Account) सुविधा बंद करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. सरकारच्या निर्णयाला पाठिंबा देत हा निर्णय घेणारे Arattai हे पहिले भारतीय मेसेजिंग अ‍ॅप ठरले आहे. विशेष म्हणजे, या अ‍ॅपमध्ये यूजरनेम फीचर यापूर्वीपासूनच उपलब्ध होते.**




### श्रीधर वेम्बू यांची घोषणा

श्रीधर वेम्बू यांनी त्यांच्या अधिकृत 'एक्स' (X) खात्यावर पोस्ट करून ही माहिती दिली. त्यांनी म्हटले की, केंद्र सरकारच्या नव्या नियमांचे पालन करण्यासाठी Arattai अ‍ॅपमधील यूजरनेमच्या आधारे खाते तयार करण्याची आणि वापरण्याची सुविधा बंद करण्यात येणार आहे. मात्र, हे फीचर नेमके कधीपासून बंद केले जाईल, याबाबत त्यांनी कोणतीही कालमर्यादा जाहीर केलेली नाही. मात्र कंपनी सरकारच्या नियमांचे पूर्ण पालन करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

### सरकारने WhatsApp ला काय सांगितले?

केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने (MeitY) मेटा कंपनीला WhatsApp मधील यूजरनेम फीचर भारतात लागू करण्यास तात्पुरती स्थगिती देण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रालयाचे म्हणणे आहे की, संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा पूर्ण होईपर्यंत आणि सायबर सुरक्षा तसेच ऑनलाइन फसवणुकीसंदर्भातील सर्व शंका दूर होईपर्यंत हे फीचर सुरू करू नये.

### नेमका वाद कशामुळे?


WhatsApp ने जून महिन्याच्या अखेरीस यूजरनेम फीचरची घोषणा केली होती. या सुविधेमुळे वापरकर्त्यांना मोबाईल क्रमांक न देता केवळ यूजरनेमच्या माध्यमातून संवाद साधता येणार होता. यामुळे गोपनीयता अधिक मजबूत होईल, असा दावा कंपनीने केला होता. मात्र, केंद्र सरकारने या फीचरबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. फसवणूक करणारे बँका, सरकारी संस्था, उद्योग किंवा प्रसिद्ध व्यक्तींच्या नावाने बनावट यूजरनेम तयार करून नागरिकांची दिशाभूल करू शकतात, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता सरकारने व्यक्त केली आहे. यात फिशिंग हल्ले, आर्थिक फसवणूक, डिजिटल अटकसारख्या ऑनलाइन फसवणुकीच्या घटना घडू शकतात, असे सरकारचे म्हणणे आहे.

### Meta कडून तांत्रिक माहितीची मागणी

या फीचरची रचना, सुरक्षा यंत्रणा आणि फसवणूक रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत केंद्र सरकारने Meta कडून सविस्तर तांत्रिक माहिती मागविली आहे. यावर WhatsApp चे म्हणणे आहे की, प्रसिद्ध व्यक्ती, सरकारी संस्था तसेच Meta-प्रमाणित (Verified) खात्यांची यूजरनेम आधीच राखीव ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे इतर कोणी त्याच नावाने खाते तयार करण्याचा प्रयत्न केल्यास ते उपलब्ध नसल्याचा संदेश प्रणालीकडून दिला जाईल.

### Arattai म्हणजे काय?


Arattai हे Zoho कंपनीचे स्वदेशी मेसेजिंग प्लॅटफॉर्म असून, त्यामध्ये वापरकर्त्यांना मजकूर संदेश, व्हॉईस कॉल आणि व्हिडिओ कॉलची सुविधा उपलब्ध आहे. आता सरकारच्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर या अ‍ॅपमधील यूजरनेम-आधारित खाते सुविधा देखील बंद करण्यात येणार आहे.




# AI शर्यतीत भारत मागे पडण्याचा धोका?

## नव्या अहवालातून इशारा, केवळ सॉफ्टवेअर नव्हे तर चिप्स, डेटा सेंटर आणि वीज ठरणार निर्णायक

**कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) क्षेत्रातील जागतिक स्पर्धा आता केवळ सॉफ्टवेअर, अ‍ॅप्स किंवा चॅटबॉटपुरती मर्यादित राहिलेली नाही. प्रगत संगणकीय चिप्स, डेटा सेंटर्स, ऊर्जा क्षमता आणि भक्कम पायाभूत सुविधा यांच्यावरच भविष्यातील नेतृत्व अवलंबून असेल, असा इशारा MUFG (मित्सुबिशी यूएफजे फायनान्शियल ग्रुप) या संस्थेच्या नव्या अहवालात देण्यात आला आहे. आवश्यक गुंतवणुकीचा वेग वाढवला नाही, तर भारत AI क्षेत्रातील जागतिक स्पर्धेत मागे पडू शकतो, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.**




### AI ची लढाई आता पायाभूत सुविधांची

अहवालानुसार, आतापर्यंत AI म्हणजे नवे अ‍ॅप्स, चॅटबॉट्स किंवा सॉफ्टवेअर विकसित करणे, अशी धारणा होती. मात्र आता परिस्थिती बदलली असून, अत्याधुनिक AI प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेले डेटा सेंटर्स, उच्च क्षमतेचे प्रोसेसर, सेमीकंडक्टर, वीजपुरवठा आणि संगणकीय क्षमता यावरच देशांचे यश अवलंबून राहणार आहे.

### AI विकासातील 7 प्रमुख अडथळे

- सेमीकंडक्टर उत्पादन क्षमता
- मेमरी चिप्सची उपलब्धता
- पुरेसा वीजपुरवठा
- डेटा सेंटर्सची उभारणी
- धोरणात्मक खनिजांचा पुरवठा
- निर्यात नियंत्रण
- तैवानशी संबंधित भू-राजकीय धोके

### प्रगत चिप्स आणि विजेचा तुटवडा ठरू शकतो अडथळा

'Bottlenecks to Scaling AI Computational Power' या १०७ पानी अहवालात म्हटले आहे की, AI मुळे जगभरात डेटा सेंटर्स, संगणकीय यंत्रणा आणि चिप्स निर्मितीसाठी अभूतपूर्व प्रमाणात गुंतवणूक होत आहे. मात्र प्रगत सेमीकंडक्टर, वीज, मेमरी चिप्स, धोरणात्मक खनिजे आणि उत्पादन क्षमता यांचा तुटवडा AI च्या विस्तारातील सर्वात मोठा अडथळा ठरू शकतो. अहवालात इंटेलचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी पॅट गेल्सिंगर यांच्या विधानाचाही उल्लेख करण्यात आला आहे. त्यांच्या मते, गेल्या ५० वर्षांत जगातील राजकारण आणि संघर्ष तेलाभोवती फिरत होते; पुढील ५० वर्षांत AI चिप्सच्या पुरवठ्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी देशांमध्ये स्पर्धा होईल. त्यामुळे सेमीकंडक्टर उत्पादन आणि त्यांचा पुरवठा हा भविष्यातील सर्वात महत्त्वाचा धोरणात्मक विषय ठरणार आहे.

### IndiaAI Mission वर भर

भारत सरकार IndiaAI Mission अंतर्गत देशाला जागतिक AI केंद्र म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच देशांतर्गत सेमीकंडक्टर उत्पादन आणि डेटा सेंटर क्षमता वाढविण्यावरही भर दिला जात आहे. मात्र MUFG च्या मते, भविष्यातील नेतृत्व हे केवळ AI मॉडेल विकसित करण्यावर नव्हे, तर अधिक गुंतागुंतीच्या AI प्रणाली तयार करण्यासाठी आणि चालविण्यासाठी आवश्यक असलेली भक्कम पायाभूत सुविधा उभारण्याच्या क्षमतेवर ठरणार आहे.

### केवळ सॉफ्टवेअर कौशल्य पुरेसे नाही

सध्या जगातील अत्याधुनिक AI संगणकीय क्षमतेपैकी सुमारे ७५ टक्के क्षमता अमेरिकेकडे, तर १५ टक्के क्षमता चीनकडे असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे भारतासह इतर देशांकडे अत्याधुनिक AI संगणकीय क्षमतेचा अत्यंत मर्यादित वाटा आहे. अहवालाचा निष्कर्ष स्पष्ट आहे की, AI क्षेत्रातील यश हे केवळ सॉफ्टवेअर कौशल्य, अभियंते किंवा AI मॉडेल विकसित करण्यावर अवलंबून राहणार नाही. त्यासाठी सेमीकंडक्टर, ऊर्जा, संगणकीय क्षमता, डेटा सेंटर्स आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये सातत्याने मोठी गुंतवणूक करणे अत्यावश्यक ठरणार आहे.

### अमेरिका आणि चीन मोठ्या आघाडीवर

अहवालानुसार, २०२६ मध्ये अमेरिका AI पायाभूत सुविधा, सॉफ्टवेअर आणि संबंधित सेवांमध्ये सुमारे २ ट्रिलियन डॉलर इतकी गुंतवणूक करेल, असा अंदाज आहे. भारताची संभाव्य गुंतवणूक ९५ अब्ज डॉलर इतकी असून ती अमेरिकेच्या तुलनेत जवळपास २० पट कमी आहे. चीनकडूनही सुमारे ३५५ अब्ज डॉलर गुंतवणूक होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे AI क्षेत्रातील जागतिक स्पर्धेत अमेरिका आणि चीन मोठ्या आघाडीवर असून, भारताला या देशांच्या बरोबरीने जाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा उभारण्याची आवश्यकता असल्याचे अहवालात म्हटले आहे.

# पावसाळ्यात एसी कोणत्या मोडवर चालवावा?; योग्य सेटिंगमुळे विजेची बचत

**देशातील अनेक भागांत मान्सूनचे आगमन झाले असून वातावरणातील तापमान कमी झाले असले तरी हवेत आर्द्रतेचे (ओलावा) प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे अनेकजण अजूनही एअर कंडिशनर (एसी) वापरत आहेत. मात्र पावसाळ्यात एसीचा योग्य मोड निवडल्यास अधिक आरामदायी वातावरण मिळण्याबरोबरच विजेचीही बचत होऊ शकते.**



- पावसाळ्यात 'ड्राय मोड' ठरतो सर्वाधिक उपयुक्त : पावसाळ्यात खोलीतील उष्णतेपेक्षा हवेत असलेला अतिरिक्त ओलावा अधिक त्रासदायक ठरतो. अशा वेळी एसीमधील 'ड्राय मोड' (Dry Mode) हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो. या मोडमध्ये एसी खोलीतील अतिरिक्त आर्द्रता कमी करतो, त्यामुळे वातावरण अधिक आल्हाददायक वाटते. तसेच या मोडमध्ये कंप्रेसर सतत सुरू राहत नाही. गरजेनुसार तो सुरू-बंद होत असल्याने 'कूल मोड'च्या तुलनेत विजेचा वापर कमी होण्यास मदत होते.
- 'कूल मोड' कधी वापरावा? : पावसाळा सुरू असला तरी काही भागांमध्ये तापमान आणि उकाडा कायम असतो. अशा परिस्थितीत 'कूल मोड' (Cool Mode) वापरणे अधिक परिणामकारक ठरू शकते. मात्र केवळ आर्द्रता कमी करण्यासाठी कूल मोड वापरणे टाळावे, कारण या मोडमध्ये विजेचा वापर तुलनेने अधिक होतो.
- 'ऑटो मोड'ही चांगला पर्याय : सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक आधुनिक एसीमध्ये 'ऑटो मोड' (Auto Mode) ही सुविधा उपलब्ध आहे. या मोडमध्ये एसी खोलीतील तापमान आणि आर्द्रतेचे प्रमाण ओळखून आपोआप आवश्यक तेवढेच कूलिंग करतो. त्यामुळे खोलीतील तापमान संतुलित राहते आणि विजेचीही बचत होते.
- योग्य मोडची निवड का महत्त्वाची? : तज्ज्ञांच्या मते, पावसाळ्यात हवेत आर्द्रता अधिक असल्याने तापमानापेक्षा ओलावाच अधिक अस्वस्थता निर्माण करतो. त्यामुळे अशा काळात योग्य मोडची निवड केल्यास कमी वीज खर्चात अधिक आरामदायी वातावरण मिळू शकते. त्यामुळे हवामानानुसार एसीचा योग्य मोड वापरणे अधिक फायदेशीर ठरते.

### या टिप्स लक्षात ठेवा...

- **पावसाळ्यात शक्यतो ड्राय मोडच वापरा.**
- **एसीचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअस दरम्यान ठेवा.**
- **खोलीचे दरवाजे आणि खिडक्या व्यवस्थित बंद ठेवा, जेणेकरून बाहेरील ओलसर हवा आत येणार नाही.**
- **एसीचा एअर फिल्टर नियमित स्वच्छ करा. त्यामुळे कूलिंग अधिक प्रभावी होते.**
- **एसीमध्ये स्लीप मोड (Sleep Mode) असल्यास रात्रीच्या वेळी त्याचा वापर करा. त्यामुळे वीज वाचण्यास मदत होते.**

# आता आधार कार्डसाठी ऑपरेटर येणार थेट घरी; सेवा कशी बुक कराल, किती शुल्क लागेल?

**आधार कार्ड बनविण्यासाठी किंवा त्यामध्ये आवश्यक बदल करण्यासाठी आता नागरिकांना आधार केंद्रावर जाण्याची गरज नाही. UIDAI ने गरजू नागरिकांसाठी होम एनरोलमेंट सेवा सुरू केली आहे. या सेवेद्वारे अधिकृत ऑपरेटर थेट घरी येऊन नवीन आधार नोंदणी, माहिती अद्ययावत करणे तसेच बायोमेट्रिक अपडेटची प्रक्रिया पूर्ण करतो. मात्र ही सुविधा सर्वांसाठी उपलब्ध नसून, केवळ आधार केंद्रावर जाण्यास असमर्थ असलेल्या नागरिकांसाठीच ही सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेसाठी नियमित आधार शुल्काव्यतिरिक्त स्वतंत्र सेवा शुल्क आकारले जाते.**

- काय आहे होम एनरोलमेंट सेवा? : UIDAI ची होम एनरोलमेंट सेवा ही विशेषतः अशा नागरिकांसाठी आहे, जे शारीरिक कारणांमुळे आधार केंद्रावर जाऊ शकत नाहीत. या सुविधेअंतर्गत नागरिकांना घरी बसून नवीन आधार कार्ड नोंदणी, आधारमधील नाव, पत्ता, जन्मतारीख आदी माहिती अद्ययावत करणे, बायोमेट्रिक (बोटांचे ठसे, डोळ्यांचे स्कॅन) अद्ययावत करणे या सेवा मिळू शकतात.
- किती लागेल शुल्क? : या सेवेसाठी नियमित आधार नोंदणी किंवा अपडेट शुल्काव्यतिरिक्त स्वतंत्र सेवा शुल्क आकारले जाते. एका पत्त्यावर एका व्यक्तीसाठी सेवा बुक केल्यास ७०० रुपये सेवा शुल्क आकारले जाईल. त्याच पत्त्यावर इतर कुटुंबीयांनाही ही सुविधा हवी असल्यास प्रत्येक अतिरिक्त व्यक्तीसाठी ३५० रुपये शुल्क द्यावे लागेल. हे शुल्क नियमित आधार अपडेट शुल्क (साधारण ५० किंवा १०० रुपये) याशिवाय स्वतंत्रपणे भरावे लागेल.
- सेवा कशी बुक कराल? : होम एनरोलमेंट सेवा बुक करण्यासाठी पुढील पर्याय उपलब्ध आहेत. १९४७ या UIDAI च्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधून सेवा बुक करता येते. अथवा आवश्यक कागदपत्रांसह संबंधित UIDAI प्रादेशिक कार्यालयाला ई-मेलद्वारे विनंती पाठवता येते. विनंती मंजूर झाल्यानंतर संबंधित नोंदणी प्राधिकरण किंवा आधार केंद्राला काम सोपविले जाते. त्यानंतर साधारण ७ ते १५ दिवसांच्या आत अधिकृत ऑपरेटर नागरिकांच्या घरी येऊन बायोमेट्रिक पडताळणी आणि इतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करतो.
- गरजूंसाठी उपयुक्त सुविधा : ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच गंभीर आजारामुळे घराबाहेर पडणे शक्य नसलेल्या नागरिकांसाठी UIDAI ची ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे अशा व्यक्तींना आधारसंबंधित कामांसाठी आधार केंद्रावर जाण्याची आवश्यकता राहत नाही आणि सर्व प्रक्रिया घरच्या घरी पूर्ण करता येते.

### कोण घेऊ शकतो या सेवेचा लाभ?

- ज्येष्ठ नागरिक
- अंथरुणाला खिळलेले रुग्ण
- अत्यंत अशक्त किंवा हालचाल करू न शकणारे नागरिक
- आधार केंद्रावर जाण्यास असमर्थ दिव्यांग व्यक्ती



## जाहीर समन्स

**नांदेड येथील ७वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात**
**(समक्ष पी.ए. खंडारे)**
**नियमित दिवाणी दावा ३८/२०२६**

पुजा
वि.
राजाराम व इतर

प्रति,

प्रतिवादी क. १ – राजाराम पि. किशनराव पवार, वय : ३३ वर्षे, धंदा : शेती.
प्रतिवादी क. ४ – ज्योती पि. किशन पवार, वय : ३५ वर्षे, धंदा : घरकाम.
प्रतिवादी क. ५ – मिरा पि. किशन पवार, वय : ३२ वर्षे, धंदा : घरकाम.
सर्व रा. मगनपुरा, नांदेड, ता. जि. नांदेड.
प्रतिवादी क. ६ – राजेश्वरी भ्र. गणेश जाधव, वय : ४५ वर्षे, धंदा : घरकाम.
रा. शिवाजी नगर, नांदेड, ता. जि. नांदेड.

दावा : कायमस्वरूपी मनाई हुकूम मिळणे बाबत...

ज्या अर्थी वरील प्रकरणामध्ये आपणास वेळोवेळी समन्स पाठविण्यात आले होते, परंतु असे दिसून येत आहे की, नमुद पत्त्यावर समन्स पाठविले असता आपण जाणून–बुजुन टाळाटाळ करीत आहात असे वादीचे म्हणणे आहे.

वर नमुद प्रतिवादी क. १, ४, ५ व ६ यांना या जाहीरसमन्सद्वारे कळविण्यात येते की, आपण **दिनांक:–१०/०८/२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता स्वत: अथवा आपल्या वकीला मार्फत हजर व्हावे अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे समजुन प्रस्तुत प्रकरणात आपल्या विरूध्द एकतर्फा आदेश पारीत केल्या जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
०१.०७.

कनिष्ठ लिपिक,
७वे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,नांदेड.

सहा. अधिक्षक,
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

---

## जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, श्री धुरपता रमेश मगरे रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. १३२/१ वार्ड क्र. ०७ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : आनंद हनवते, **पश्चिमेस** : माधव हनवते, **दक्षिणेस** : रस्ता, **उत्तरेस** : दिगांबर हनवते.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**Invitation for Bids, E-Tender Notice T-07**

The Superintending Engineer (O&M Circle, Nanded) on behalf of MSEDCL (Employer) invites the bids from reputed agencies for E-Tender **"Work of Preventive Maintenance of sub-stations under O&M Circle Nanded"**

**SE/NDC/TS/2026-27/T-07 of Rs. 80 Lakhs**

Tender sale date of the above tender is extended and tender documents can be downloaded from employer's website site https://etender.mahadiscom.in/eatApp up to **Dt. 07.07.2026** after payment of E-tender fees online. For more details, please contact Ex. Engineer (Adm), Nanded Circle. Mob. No: 7558376333

This office reserves all the right to reject any or all the offers without assigning any reason thereof.

**PRO No39/2026-27**
**dt.03.07.26**

**Superintending Engineer**
MSEDCL, Circle Office Nanded.

---

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २१३/२०२६
(CNR No.MHND10007672026)

१. सविता नरहरी संगेवार, वय – ८५ वर्षे धंदा – घरकाम
२. पुरुषोत्तम नरहरी संगेवार वय – ६६ वर्षे, धंदा – पेन्शनर, ३ उमाकांत पि. नरहरी संगेवार वय–६२ वर्षे, धंदा – पेन्शनर, ४. अनुसया किशोर नोमुलवार वय – ५४ वर्षे धंदा – घरकाम रा. नांदेड, ५ रेणुका सुर्यकुमार यन्नावार वय – ५२ वर्षे–धंदा घरकाम, ६. ओमप्रकाश नरहरी संगेवार वय – ५५ वर्षे, धंदा – व्यापार, ७. प्रशांत नरहरी संगेवार वय – ५३ वर्षे, धंदा – नौकरी, सर्व रा. कंधार ता. कंधार जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार–एस. बी. आय शाखा कंधार जि. नांदेड

प्रकरण –भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ नुसार वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेबाबत.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांची वडिल नामे नरहरी मारोती संगेवार हे होते. ते दिनांक ०९/०३/२०२६ रोजी कंधार ता. कंधार येथे मयत झाले आहेत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत नरहरी मारोती संगेवार यांचे वारस असल्याबाबत गैरअर्जदार एस. बी. आय. शाखा कंधार जि. नांदेड यांच्या बचत खाते क्र. ५२१७५२४९१११ मध्ये रक्कम रुपये १,४०,०२३.९३/– (एक लाख चाळीस हजार तेवीस रुपये त्र्यान्नव पैसे) इतकी जमा आहे सदरील खात्यांमध्ये जमा असलेली रक्कम अर्जदार यांना मिळणेसाठी वारसा प्रम णपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत नरहरी मारोती संगेवार यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र (डीललर्शीीळेप उर्शीींळषळलरींश) देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख– ३०/०७/२०२६.

आज रोजी दि.२४/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, कंधार

---

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३९३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १२ मालमत्ता क्र. २२८/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, समीना शेख मुबीन रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २२८/२ व वार्ड नं. १२ लता सुरेश मुबीन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. २९/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – लता माने यांचे घर, पश्चिमेस – स्मशानभूमी तटभींत, दक्षिणेस – पंचफुलाबाई डाके यांचे घर, उत्तरेस – कॉलनी रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३९५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. ९४६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, विठ्ठल गोविंद गुंडाळे रा. परमेश्वर गल्ली ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ९४६ व वार्ड नं. १७ सुरेश किशन पवनेकर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ३१४/२०२६ दि. २६/०२/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – ९ मीटर रस्ता, पश्चिमेस – प्लॉट नं. २ ज्याचा न.प.९२८ ची जागा, दक्षिणेस – प्लॉट नं. २६ ज्याचा न.प. ९४७ ची जागा, उत्तरेस – प्लॉट नं. २४ ज्याचा न.प. ९४५ ची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३९४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ६६५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मोहम्मद मुस्तफा मोहम्मद खाजा रा. इब्राहिम कॉलनी मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६६५ व वार्ड नं. १८ अ शेख महेबुब शेख अकबर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ८६२/२०२६ दि. २४/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. ७० ची जागा, पश्चिमेस – २० फुटाचा रस्ता, दक्षिणेस – प्लॉट क्र. ६० ची जागा, उत्तरेस – २५ फुटाचा रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३९२

नाव परिवर्तन वार्ड क्र. १२ मालमत्ता क्र. २२५/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मारोती परमेश्वर बक्केवाड रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २२५/१ व वार्ड नं. १२ अफसाना बेगम शेख अहेमद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. ३०/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – पंचफुलाबाई यांचे घर, पश्चिमेस – स्मशानभूमी, दक्षिणेस – रस्ता, उत्तरेस – शमीना शेख मुबीन यांचा प्लॉट.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३९१

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ४१७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख वाजीद शेख मजीद रा. उमर चौक मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४१७ व वार्ड नं. १४ मोहम्मद शरफोद्दिन शेख हुसेन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ८३१/२०२६ दि. १९/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – वानखेडे यांचे शेत, पश्चिमेस – प्लॉट नं. ७ ची जागा, दक्षिणेस – कॉलनी रस्ता, उत्तरेस – प्लॉट नं. १ ची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३९०

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५१७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सुभाष शंकर राचटवार रा. आंबेडकर चौक मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५१७ व वार्ड नं. २१ व्यंकटरमन बाबुराव ओद्दीवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ११५९/२०२५ दि. १६/०९/२०२५ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ६३ ची जागा, पश्चिमेस – प्लॉट नं. ६१ ची जागा, दक्षिणेस – बोरगडीकडे जाणारा रस्ता, उत्तरेस – प्लॉट नं. ७७ ची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३९६

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ७२६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सतीष गणपत कदम रा. विजयानगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७२६ व वार्ड नं. १५ संदिप दत्तात्रय तुप्तेवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ८३७/२०२६ दि. १९/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – कॉलनी रस्ता, पश्चिमेस – पार्थ संदिप तुप्तेवार यांचे शेत, दक्षिणेस – प्लॉट नं. ४० ची जागा, उत्तरेस – प्लॉट नं. ३८ ची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, श्री उज्वला साहेबराव हनवते रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. १९८/१ वार्ड क्र. ०८ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : कोल्हे यांची जागा, **पश्चिमेस** : धुरपताबाई खंदारे, **दक्षिणेस** : रोड, **उत्तरेस** : कांबळे यांची जागी.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, श्री मिलींद उत्तम हनवते रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. १२२/२ वार्ड क्र. ०७ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : शाम उत्तम हनवते, **पश्चिमेस** : मनोहर संभाजी हनवते, **दक्षिणेस** : ललीता वामन बनसोडे, **उत्तरेस** : रामचंद्र गोमाजी हनवते.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, श्री शामराव संभा बनसोडे रा. रॉयल नगर ता. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. ६१ वार्ड क्र. १५ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

चतु:सिमा :
पूर्वेस : प्रकाश लोखंडे, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : पंजाबराव बनसोडे, उत्तरेस : प्रदीप गाडेकर.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, श्री ज्योती भगवान पाईकराव रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. २९७/१ वार्ड क्र. ०७ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : डॉ. देवसरकर, **पश्चिमेस** : देवय्या सेठ, **दक्षिणेस** : बोळ, **उत्तरेस** : सईद अरब मौलाना.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, श्री मनोहर संभाजी हनवते रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. १२२/०४ वार्ड क्र. ०७ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : शामा उत्तमराव हनवते, **पश्चिमेस** : उत्तम मारोती हनवते, **दक्षिणेस** : बोळ, **उत्तरेस** : बोळ.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

---

## जाहिर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार नरसिंह बालाजी भंडरवार वय ४० रा. मरळक खु. ता.जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे मुलाचे योगेश नरसिंह भंडरवार, नांदेड, ता.जि. नादेड यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे

जन्म झालेल्यांचे योगेश नरसिंह भंडरवार रा. मरळक खु. नांदेड, ता.जि नांदेड सदर व्यक्तीचा जन्म प्राथमिक आरोग्यकेंद्र लिंबगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक १९.११.२०१४ या दिवशी जन्म झाला असल्याने नमूद केले आहे. जन्म प्रमाणपत्र मिळणे व आदेश होणेकरीता सदर कार्यालयात दिनाक ०६.०४.२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांक/ठिकाण बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसिलदार, नांदेड

---

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार सुभाष पि. आनंदराव अडकिणे, रा. डोंगरकडा, ता. कळमनुरी जि. हिंगोली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन जाहिर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार सुभाष पि. आनंदराव अडकिणे है, रामकृष्ण प्रभुराव पाटील रा.उदगीर ता. उदगीर जि. लातूर, प्रशांत भाऊराव कदम रा. सन्मित्र कालोनी ता. जि. नांदेड, बालाजी रामजी कदम रा. नाईक नगर ता.जि. नांदेड, विमल बालाजी कदम, रा. नाईक नगर ता. जि. नांदेड व विश्वास बालाजी कदम, रा नाईक नगर ता. जि. नांदेड, याच्यांकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील मौजे तरोडा खु. ता.जि. नांदेड येथील गट नं. ८० पैकी तिरुमला पार्क मधील प्लॉट नंबर १९ आहे. ज्याची लावी पूर्व पश्चिम १२.२० मी व रुंदी दक्षिण उत्तर ९.१४ मी. आहे ज्याचे एकूण क्षेत्रफळ १११.७४५ चौ.मी. (१२०५) चौ.फु.) आहे. ज्याची चतुः सिमा पुर्वेस ९ मीटर रोड, पश्चिमेस गट नंबर ८०, दक्षिणेस प्लॉट न. २० असुन उत्तरेस प्लॉट नं.१८ आहे. ही मालमता खरेदी करण्याचा सौदा केलेला असुन बयानापोटी रक्कम रुपये पण दिले आहे.

तरी वरील नमुद व्यवहाराबाबत कोणास काही आक्षेप उजर वा इतर काही वक्षीस कुळ इत्यादी असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासहीत सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत कळवावा. मुदतीनतर आलेले आक्षेप वा उजर ग्राह्य धरल्या जाणार नसून ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

सबब हे आहीर प्रगटन

Sd/-
Adv. Galbale Gajarian
Somnath, Dongarkada
Reg. No. MH/3945/2019

---

## Change In Name

My old name is **ANJALI RITESH BAIS** which now I am changing as New name **ANJALI DEEPAK SINH HAZARI.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please Consider the same.

- CONTACT - Anjali Anjali Deepak sinh Hazari H.No. 2-11-47/2, Borban Factory, govardhan ghat road, Nanded.
Mob.No. 9421848258.

---

## Change In Name

My old Name is **GUNVANT BALASAHEB PAWDE** now I am Changing as New Name **GUNVANTBALAJIRAOPAWDE.**Correspondence will be done as per my new name. Please consider the same, Sign by, GUNVANT BALAJIRAO PAWDE

Address: 1-18-394 GANGOTRI NIWAS, PURNA ROAD, BEHIND B.S.N.L. OFFICE, DEEP NAGAR, NANDED, TARODA ROAD NANDED, MAHARASHTRA 431605 Mob: 9168546046

---

## Change In Name

My Old Name is **PRIYA NAGURE** which now I am changing as New Name **PRIYA HARSHAD HURNE** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - 12, Ashok Nagar, Near Hanuman Mandir, Nanded 431602**

---

## Change In Name

My Old Name is **HARSHAD HURNE** which now I am changing as New Name **HARSHAD PRADEEP HURNE** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - 12, Ashok Nagar, Near Hanuman Mandir, Nanded 431602**

---

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार शंकर पि. भुजंगराव अडकिणे, रा. डोंगरकडा, ता. कळमनुरी जि. हिंगोली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहिर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार शंकर पि. भुजंगराव अडकिणे हे, रामकृष्ण प्रभुराव पाटील रा.उदगीर ता.उदगीर जि. लातूर, प्रशांत भाऊराव कदम रा. सन्मित्र कालोनी ता. जि.नांदेड, बालाजी रामजी कदम रा. नाईक नगर ता. जि. नांदेड, विमल बालाजी कदम, रा.नाईक नगर ता.जि. नांदेड व विश्वास बालाजी कदम, रा. नाईक नगर ता. जि. नांदेड, यांच्याकडून त्याच्या मालकी व ताब्यातील मौजे तरोडा खु.ता.जि. नांदेड येथील गट नं. ८० पैकी तिरुमला पार्क मधील प्लॉट नंबर ३६ आहे. ज्याची लांबी पूर्व पश्चिम १४.०० मी व रुंदी दक्षिण उत्तर ९.१४ मी. आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२७.९६० चौ. मी. (१३७६.८४ चौ.फु.) आहे. ज्याची चतुः सिमा पुर्वेस ९ मीटर रोड, पश्चिमेस प्लॉट नं. २५, दक्षिणेस प्लॉट नं.३७ असुन उत्तरेस प्लॉट नं.३५ आहे. ही मालमता खरेदी करण्याचा सौदा केलेला असुन बयानापोटी रक्कम रुपये पण दिले आहे.

तरी वरील नमुद व्यवहाराबाबत कोणास काही आक्षेप उजर वा इतर काही वक्षीस कुळ इत्यादी असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासहीत सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत कळवावा. मुदतीनंतर आलेले आक्षेप वा उजर ग्राह्य धरल्या जाणार नसून ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

सबब हे जाहिर प्रगटन

Sd/-
Adv. Galbale Gajarian
Somnath, Dongarkada
Reg. No. MH/3945/2019

---

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार दिलीप पि. बलासाहेब अडकिणे, रा. डोंगरकडा, ता. कळमनुरी जि. हिंगोली यानी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहिर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार दिलीप पि बलासाहेब अडकिणे है, रामकृष्ण प्रभुराव पाटील रा. उदगीर ता. उदगीर जि. लातूर, प्रशांत भाऊराव कदम रा. सन्मित्र कालोनी ता जि. नांदेड, बालाजी रामजी कदम रा. नाईक नगर ता.जि. नांदेड, विमल बालाजी कदम, रा. नाईक नगर ता.जि. नांदेड व विश्वास बालाजी कदम, रा. नाईक नगर ता.जि. नांदेड, यांच्याकडून त्याच्या मालकी व ताब्यातील मौजे तरोडा खु ता.जि. नांदेड येथील गट न. ८० पैकी तिरुमला पार्क मधील प्लॉट नंबर ३७ आहे. ज्याची लाबी पूर्व पश्चिम १४.०० मी व रूंदी दक्षिण उत्तर ९.१४ मी. आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२७१९६० चौ.मी. (१३७६.८४ चौ, फु.) आहे. ज्याची चतु:सिमा पुर्वेस ९ मीटर रोड, पश्चिमेस प्लॉट नं.२४, दक्षिणेस प्लॉट नं. ३८ असुन उत्तरेस प्लॉट नं. ३६ आहे. ही मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा केलेला असून बयानापोटी रक्कम रूपये पण दिले आहे.

तरी वरील नमुद व्यवहाराबाबत कोणास काही आक्षेप उजर वा इतर काही बक्षीस कुळ इत्यादी असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासहीत सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत कळवावा. मुदतीनंतर आलेले आक्षेप वा उजर ग्राह्य धरल्या जाणार नसून ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन

Sd/-
Adv. Galbale Gajarian
Somnath, Dongarkada
Reg. No. MH/3945/2019

---

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार गजानन पि सोपानराव राऊत, रा. डोंगरकडा, ता. कळमनुरी जि. हिंगोली यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहिर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार गजानन पि सोपानराव राऊत है, रामकृष्ण प्रभुराव पाटील रा.उदगीर ता. उदगीर जि. लातूर, प्रशांत भाऊराव कदम रा. सन्मित्र कालोनी ता. जि. नांदेड, बालाजी रामजी कदम रा. नाईक नगर ता.जि. नांदेड, विमल बालाजी कदम, रा. नाईक नगर ता. जि. नांदेड व विश्वास बालाजी कदम, रा. नाईक नगर ता.जि. नांदेड, याच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील मौजे तरोडा खु. ता. जि. नांदेड़ येथील गट नं. ८० पैकी तिरुमला पार्क मधील प्लॉट नंबर १८ आहे. ज्याची लांबी पूर्व पश्चिम १२.२० मी व रुंदी दक्षिण उत्तर ९.१४ मी. आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १११.७४५ चौ.मी. (१२०५) चौ.फु.) आहे. ज्याची चतुः सिमा पुर्वेस ९ मीटर रोड, पश्चिमेस गट नंबर ८०, दक्षिणेस प्लॉट नं. १९ असुन उत्तरेस प्लॉट नं.१७ आहे. ही मालमता खरेदी करण्याचा सौदा केलेला असुन बयानापोटी रक्कम रूपये पण दिले आहे.

तरी वरील नमुद व्यवहाराबाबत कोणास काही आक्षेप उजर वा इतर काही बक्षीस कुळ इत्यादी असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासहीत सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत कळवावा. मुदतीनंतर आलेले आक्षेप वा उजर ग्राह्य धरल्या जाणारं नसून ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन

Sd/-
Adv. Galbale Gajarian
Somnath, Dongarkada
Reg. No. MH/3945/2019

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# सराफा व्यापाऱ्यास लुटणारी टोळी जेरबंद

**नांदेड (प्रतिनिधी)–** हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे सराफा दुकान चालविणारे विजयसिंह राजपूत यांना २९ जूनच्या रात्री आठच्या सुमारास लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत शिवम बारजवळ चाकूचा धाक दाखवून अनोळखी चोरट्यांनी लुटले होते. त्यांच्याकडील तीन किलो चांदीचे दागिने या चोरट्यांनी लंपास केले होते. अखेर हे चोरटे स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकले. त्यांच्याकडून चोरलेले सर्व तीन किलो चांदीचे दागिने जप्त करून एका अल्पवयीन बालकासह चार जणांना अटक केली आहे. या गुन्ह्यात अजून काही आरोपी वाढण्याची शक्यता पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी पत्रकार परिषदेत वर्तविली.

नांदेड ग्रामीण उपविभागांतर्गत लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत २९ जून रोजी रात्री आठच्या सुमारास शिवम बार परिसरात अनोळखी चोरट्यांनी जुन्या वादातून सराफा विजयसिंह राजपूत यांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्याकडील तीन किलो चांदीचे दागिने (६ लाख ८१ हजार रुपये) लंपास केले होते. या प्रकरणाचा गुन्हा लिंबगाव पोलीस ठाण्यात दाखल झाला होता. लिंबगाव पोलिसांसोबत

## तीन किलो चांदीचे दागिने जप्त



समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करत होते. स्थागुशाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले आणि लिंबगाव ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ बोधनकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांची टीम गोपनीय माहिती काढत होती. सोनकांबळे यांच्या खबऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून वसमत येथील चोरट्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यात अक्षय चंद्रकांत कुलथे (वय २१ रा. झेंडा चौक वसमत), साहिल ओंकार केंजकर (वय १९ रा. सर्व मित्र कॉलनी नांदेड), गोपाल विवेक रापतवार (वय २१ रा. सोमवार पेठ वसमत) आणि एक अल्पवयीन यांचा समावेश आहे. पोलिसांनी अक्षय कुलथे याला विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने वरील गुन्हा केल्याची कबुली दिली. विशेष म्हणजे अक्षय कुलथे यांनी विजयसिंह राजपूत यांच्या वडिलांसोबत झालेल्या वादातून हा गुन्हा केल्याचे सांगितले. एवढेच नाही तर अक्षय कुलथे याने सहकारी चोरटा गोपाल विवेक रापतवार याला एक लाख रुपये देऊन विजय राजपूत यांना जबर मारहाण करण्यासाठी कट रचला होता हे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात अजून आरोपी वाढण्याची शक्यता पोलीस अधीक्षक निलाभ रोहन यांनी वर्तविली.

## अँटी थेप्ट पेट्रोलिंग पथक स्थापन

जिल्ह्यातील घरफोडी, चोरी व इतर मालमत्तेविषय गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी नांदेड शहर, इतवारा व नांदेड ग्रामीण या उपविभागामध्ये विशेष 'अँटी थेप्ट पेट्रोलिंग' पथक कार्यान्वित करण्यात आले आहे. प्रत्येक पथकामध्ये एक पोलीस अधिकारी व तीन अंमलदार यांचा समावेश असून ही पथके दररोज नियमित ठरवून दिलेल्या परिसरामध्ये गस्त घालणार आहेत. विशेषतः बसस्थानके, रेल्वे, एटीएम, बँक, पेट्रोल पंप, व्यापारी संकुले, निर्जन भाग अशा ठिकाणी त्यांचे विशेष लक्ष राहणार आहे. या पथकांवर पोलीस नियंत्रण कक्षामार्फत सातत्याने लक्ष ठेवण्यात येणार असून, वरिष्ठ अधिकारी नियमित तपासणी करणार आहेत. या उपक्रमामुळे मालमत्तेविषय गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ होईल असा विश्वास पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी व्यक्त केला आहे.

## अतिरेकी शहजाद भट्टी याच्या सोशल माध्यमावर तरुणांनी संपर्क करू नये

पाकिस्तानात वास्तव्यास असलेला अतिरेकी शहजाद भट्टी व त्याचे अन्य चार साथीदार वेगवेगळ्या सोशल माध्यम अकाउंटवरून महाराष्ट्रातील काही युवकांना आपले फॉलोअर्स करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अशा युजर्सनी कुठल्याही instagram वर किंवा अन्य सोशल माध्यमावर आपली ओळख देऊ नये किंवा त्याच्याशी फॉलोअर्स होऊ नये. जेणेकरून आपण त्या गुन्ह्यात सहभागी होणार नाही याची तरुणांनी काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक निलाभ रोहन यांनी केले आहे. जे युवक आपल्या सोशल माध्यमावर तलवार, खंजर, घातक शस्त्र किंवा दादागिरीचे पोस्ट व्हायरल करतात अशा मुलांना विशेष करून ही मंडळी पाकिस्तानमधून आपले युजर्स बनवण्यासाठी प्रयत्न करतात.

# अवैध वाळू वाहतुकीवरील कारवाईत दोन हायवा जप्त; ३०.३२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत हिमायतनगर पोलिसांनी दि. २ जुलै रोजी सलग दोन कारवाया करून अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा जप्त केले आहेत.

पहिल्या कारवाईत गुन्हा क्र. १७९/२०२६ अंतर्गत सोनारी येथील टोलनाका येथे मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा क्रमांक (MH-26-BL-8061) पकडण्यात आला. या प्रकरणी चालक बाबुराव गणपती कोठुळे व वाहन मालक विनायक हनुमंतराव हजापुरे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच गौण खनिज अधिनियम कलम ४ व २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत गुन्हा क्र. १८०/२०२६ अंतर्गत पोटा (बु.) बसस्थानक परिसरात सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारा



हायवा क्रमांक (MH-26-D-2214) जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक विजय गोविंद जाधव व वाहन मालक राजेश्वर काशिनाथ राचेवाड यांच्याविरुद्ध त्याच कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही कारवायांमध्ये मिळून दोन हायवा वाहने (प्रत्येकी १५ लाख) व अंदाजे ८ ब्रास वाळू (३२ हजार) असा एकूण ३० लाख ३२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि शेख व हवालदार नागरगोजे यांनी केली आहे. जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरुद्ध अशाच प्रकारच्या कठोर कारवाया यापुढेही सुरू राहणार आहेत.

# सोमेश्वरी मंगनाळीकर जिल्ह्यात प्रथम तर राज्यात चौथी

**नांदेड (प्रतिनिधी)–** इयत्ता आठवी स्कॉलरशिप परीक्षेत कोनाळे कोचिंग क्लासेसची विद्यार्थिनी सोमेश्वरी मंगनाळीकर हिने नांदेड जिल्ह्यातून सर्वप्रथम तर संपूर्ण राज्यातून ४ था (स्टेट रँक ४) क्रमांक पटकावला आहे.



नीट, जेईई, सीईटी व शालेय स्तरावरील स्कॉलरशिपसह इतर स्पर्धा परीक्षांच्या गुणवत्तापूर्ण शिकवणीसाठी राज्यभरातील विद्यार्थी व पालकांची सर्वप्रथम पसंती बनलेल्या कोनाळे कोचिंग क्लासेसने स्कॉलरशिप परीक्षेतही देदीप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे. सोमेश्वरीने आपल्या यशाचे श्रेय आई–वडील व केसीसीच्या सर्व शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण शिकवणीला दिले आहे. कोनाळे कोचिंग क्लासेसच्या फाऊंडेशन बॅचच्या यशाबद्दल सर्वत्र तिचे अभिनंदन होत असून, संस्थापक प्रा. व्ही. डी. कोनाळे यांनी गुणवंत विद्यार्थी व पालकांच्या विश्वासास आम्हाला पात्र ठरता आल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# आंबेडकरवादी मिशनचे कार्य विद्यार्थी व अधिकाऱ्यांसाठी आदर्श –अबिनाश कुमार



**नांदेड (प्रतिनिधी)–** आंबेडकरवादी मिशन येथे विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी प्रयत्न केले जातात. ते तर आदर्श आहेतच, शिवाय अधिकारी यांनाही मिशनच्या कामातून आदर्श घेता येतो, असे प्रतिपादन पुण्याचे नूतन पोलीस उपायुक्त अबिनास कुमार यांनी केले.

अबिनाश कुमार यांची नुकतीच पुणे येथे पोलीस उपायुक्तपदी बदली झाली. त्यानिमित्त आंबेडकरवादी मिशन येथे त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अबिनाश कुमार बोलत होते.

पोलीस उपायुक्त अबिनाश कुमार यांनी आंबेडकरवादी मिशनचा १८ तास अभ्यास उपक्रप पोलीस मुख्यालय येथे राबून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी जिल्ह्यात कृतिशील आदर्श निर्माण केला होता. अनेक वेळा आंबेडकरवादी मिशनच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. शिक्षण, रोजगार मेळावा या क्षेत्रात त्यांनी भरीव कार्य केले. त्यांचा नांदेड येथील कार्यकाळ म्हणजे पोलीस प्रशासनातील आदर्श काळ होता, असे आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी अबिनाश कुमार यांच्या सत्कारप्रसंगी गौरवोद्गार काढले.

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणींना वैमानिक होण्यासाठी 'गिविंग विंग्स टू फ्लाई' उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या पुढाकाराने व भारत केअर्स यांच्या सहकार्याने 'गिविंग विंग्स टू फ्लाई' या उपक्रमांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुण महिलांना व्यावसायिक वैमानिक बनण्यासाठी मार्गदर्शन करणारी आभासी बैठक दि. १ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत भारत केअर्सचे संसाधन व्याख्याते कालपेश मोहोड यांनी वैमानिक क्षेत्रातील संधी, प्रशिक्षण प्रक्रिया, आवश्यक पात्रता, करिअरच्या विविध संधी तसेच व्यावसायिक वैमानिक होण्यासाठी आवश्यक असलेल्या टप्प्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थिनींना या क्षेत्राकडे आत्मविश्वासाने पाहण्याचे आवाहन केले.सदर उपक्रमामध्ये १८ ते ३५ वयोगटातील




भारतीय महिलांसाठी व्यावसायिक पायलट प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येत असून, प्रशिक्षणामध्ये कमर्शियल पायलट लायसन्स, टीआर टाईप रेटिंग प्रशिक्षण, निवड प्रक्रियेसाठी प्रवास व निवास खर्च, वैद्यकीय सुविधा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांचा समावेश आहे.

या आभासी बैठकीस विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान अभ्यासक्रमाचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, स्त्री अध्ययन केंद्राच्या केंद्र प्रमुख डॉ. शालिनी कदम, भारत केअर्सचे भगवान बिदाराकोटे, मानसी दीवान तसेच दत्ता कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य व संबंधित अधिकारी उपस्थित होते. सर्व महाविद्यालयांना परिपत्रक पाठविले आहेत. त्यानुसार विद्यार्थिनींनी ७ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करावा व या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व समन्वय विद्यार्थी विकास विभागामार्फत करण्यात आले. बैठकीचे आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांनी केले. त्यांनी भारत केअर्सच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

# लक्ष्मीबाई टरके यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा



तालुक्यातील किवळा येथील ज्येष्ठ महिला नागरिक लक्ष्मीबाई धोंडीबा पाटील टरके यांचे ३ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. ४ जुलै रोजी दु. १ वाजता किवळा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. संभाजी टरके, बबनराव टरके, संतोष टरके यांच्या त्या आई होत तर सेवानिवृत्त शिक्षक रतन पाटील सर्जे यांच्या सासू होत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी आधार प्रमाणीकरण व ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करा –जिल्हाधिकारी

**नांदेड (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक चालू मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे पीक कर्जाची वेळेत परतफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ही कर्जमुक्ती योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा विचार करण्यात येणार आहे.

योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच सन २०२२–२३, २०२३–२४ आणि २०२४–२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल करुन नियमानुसार विहित वेळेत परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आहे, त्यांनी 'एक रक्कमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य आहे.

## नांदासौख्यभरे

**शेंदारकर – उपळाईकर**

नांदेड येथील रहिवासी रावसाहेब शेंदारकर यांचे नातू तथा दीपक रावसाहेब शेंदारकर यांचे सुपुत्र चि. अभिषेक व सोलापूर जिल्ह्यातील उपळाई बु. ता. माढा येथील रहिवासी दशरथ विठ्ठल उपळाईकर यांची नात तथा मच्छिंद्र दशरथ उपळाईकर यांची सुकन्या चि. सौ. कां. डॉ. अंकिता यांचा शुभविवाह शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.४२ वाजता ए. के. संभाजी मंगल कार्यालय नांदेड येथे संपन्न होत आहे. वधू–वरांना हार्दिक शुभेच्छा!

**–मुख्यसंपादक**

# 'एसआयआर' अमलबजावणीसाठी काँग्रेस मैदानात; चित्रफितीद्वारे कार्यकर्त्यांना प्रशिक्षण

**मुदखेड (प्रतिनिधी) –** विशेष मतदार यादीत पुनरीक्षण प्रत्येक गावात शासकीय स्तरावरून प्रभावीपणे अमलबजावणीसाठी काँग्रेस पक्ष मैदानात उतरला आहे. भोकर विधानसभा मतदारसंघातील मुदखेड, अर्धापूर, भोकर तिन्ही तालुक्यांत समन्वयक नियुक्त केले असून, चित्रफितीच्या प्रक्षेपणातून बीएलओ यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. घर चलो अभियान राबविण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला आहे.

सन २००२ ची मतदार यादी पुनर्गठीत करण्यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने राज्यात ३० जून पासून विशेष मतदार यादी सुधारणा अभियान प्रभावीपणे शासकीय स्तरावर राबविले जात आहे. यासाठी काँग्रेस पक्षाच्यावतीने गावपातळीवर समन्वयक नेमून नियोजन करण्यात आले आहे. मुदखेड तालुक्यातील बारड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात भोकर विधानसभा मतदारसंघातील मुदखेड, अर्धापूर, भोकर काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी विशेष मार्गदर्शन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन खा. प्रा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी काँग्रेस उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, काँग्रेस महानगराध्यक्ष अब्दुल गफार अब्दुल सत्तार, भोकर विधानसभा बीएलओ १ प्रमुख पप्पू पाटील कोंडेकर, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाढे, एसआयआर प्रशिक्षण निरीक्षक विवेक जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

निवडणूक आयोगाच्या वतीने नव्याने तयार करण्यात येणाऱ्या मतदार यादीतून कोणत्याही नागरिकाचे नाव वगळले जाऊ नये तसेच प्रत्येक मतदारास मतदानाचा हक्क मिळावा यासाठी भारतीय राष्ट्रीय



काँग्रेस पक्षाने दक्षता घेण्यासाठी घर चलो अभियान राबविण्याचा निर्धार केला आहे. बीएलओ प्रमुख पप्पू पाटील कोंडेकर यांच्या नेतृत्त्वाखाली तालुक्यातील प्रत्येक गावात घर चलो अभियान राबविले जाणार आहे.

या शिबिरात काँग्रेस कार्यकर्त्यांना एसआयआर अभियान कसे राबवायचे याबाबत प्रशिक्षक विवेक जाधव यांनी चित्रफितीच्या माध्यमातून सविस्तर प्रशिक्षण दिले. काँग्रेसच्या बीएलओने मतदारांना (इ –फॉर्म) माहिती द्यावी, नावातील चुका, विसंगती दुरुस्ती करून घेण्यासंदर्भात मतदारांना माहिती दिली जाणार आहे. नवीन मतदारांची नावनोंदणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे. अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. मतदार यादी सुधारण्यासाठी नोटिसा बजावल्या जाणार असून, सुनावणीसाठी केंद्रावर मतदारांना बोलविले जाणार आहे याची माहितीही प्रत्येक नागरिकांपर्यंत पोचविण्यासंदर्भात देण्यात आली. एसआयआर म्हणजे शुद्धीकरण प्रक्रिया असून प्रत्येक नागरिकांसाठी महत्त्वाची व फायद्याची आहे. मतदानाचा हक्क सुरक्षित करण्यासाठी जुन्या यादीचे पुनर्गठन केले जात असून मतदारांचे नाव चुकून वगळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे काँग्रेसच्या या अभियानामुळे मतदारांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे.

मतदार यादीतील नावाची चुकीची दुरुस्ती करण्यासाठी (इ –फॉर्म) भरून दिल्यास सहज दुरुस्ती केली जाऊ शकते. यासोबतच १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवा मतदारांना यादीत नाव नोंदविण्याची उत्तम संधी उपलब्ध झाली असल्याची माहिती प्रशिक्षणात देण्यात आली. बोगस तसेच दुबार नाव वगळून केवळ पात्र आणि खऱ्या मतदारांची यादी तयार होणार असल्याने लोकशाही बळकटीसाठी काँग्रेसने वज्रमुट बांधली आहे.

या अभियानासाठी समन्वयक प्रमुख पप्पू पाटील कोंडेकर, भोकर काँग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद पाटील गौड, मुदखेड काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, अर्धापूर काँग्रेस तालुकाध्यक्ष सुनील वानखेडे, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण, सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे, भोकर काँग्रेसचे अध्यक्ष तोफिक इनामदार, बाळासाहेब आंबेगावकर, डॉ इंगळे, गिरीश कोतांवर, विश्वनाथ पवार निवघेकर, गणपत शिंदे नागेलीकर, महेश देशमुख बारडकर, श्रीनिवास महादवाड, गंगाधर डांगे, नगरसेवक अविनाश चौदंते, संजय बोकेफोड, बंडू पाटील शंकतीर्थकर, शंभुनाथ पवार, गणेश लखे, अनिल कल्याने, तेजस जाधव, गजानन संबोड यांच्यासह बीएलओ, काँग्रेस कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# महानगरपालिकेत मान्सूनपूर्व तयारी व आपत्ती व्यवस्थापनाचा आयुक्तांनी घेतला आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा सामना प्रभावीपणे करण्यासाठी, शहरातील नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी शुक्रवार, दि.३ जुलै रोजी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली मान्सूनपूर्व कामांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस महापालिकेतील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

या बैठकीत आयुक्तांनी स्पष्ट संकेत दिले की, पावसाळ्यात शहरातील नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता प्रत्येक विभागाने घ्यावी आणि कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही.

बैठकीच्या प्रारंभी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. फरहतुल्ला बेग यांनी विभाग



प्रमुखांना ठरवून दिलेल्या मान्सूनपूर्व कामांचा लेखाजोखा सादर केला असता पालिका आयुक्तांनी विभागनिहाय मान्सूनपूर्व तयारीचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील मुख्य आणि अंतर्गत नाल्यांची सफाई पूर्ण झाली असून, काही ठिकाणी काम शिल्लक असल्यास तातडीने पूर्ण करावे. नाल्यांच्या प्रवाहात असणारे सर्व अडथळे तत्काळ हटवून सखल भागात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण आणि मनपाच्या संबंधित विभागांनी योग्य समन्वय साधावा. शहरातील रस्त्यांवरील सुरू असलेली खोदाई थांबवून अर्धवट कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेचा मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन कक्ष, क्षेत्रिय कार्यालय स्तरावरील कक्ष आणि २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाईन यंत्रणा पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वादळी वाऱ्यामुळे दुर्घटना घडू नये म्हणून शहरातील सर्व अनधिकृत व धोकादायक होर्डिंग्ज काढण्यात यावेत असे निर्देश दिले आहेत.

## निष्काळजीपणावर होणार कडक कारवाई

या सर्व पार्श्वभूमीवर उद्या सकाळी काही महत्त्वाच्या ठिकाणी आयुक्त स्वत: भेटी देऊन पाहणी करणार आहेत. तसेच बैठकीच्या शेवटी आयुक्तांनी सर्व क्षेत्रिय अधिकारी आणि अभियंत्यांना आपापल्या क्षेत्रातील कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आदेश दिले. दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा या बैठकीत आयुक्तांनी दिला आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com